

# श्री साईलीला

COMPLIMENTARY.

मे किं. ५० न. पैसे १९६३

स्थापना १९१६



साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

ई. आर. मालपेकर

जिनेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ६९६३१



# श्री साई वाक्सुधा

काम, क्रोध, अभिमान वगैरे वृत्ती ज्यावेळीं आपल्या अंतःकरणांत कडाडून उसळतात त्यावेळीं त्यांच्यावर ताबा ठेवणें फार जड जातें. मनुष्य त्यांच्यापायीं हतबल होतो. त्या दुष्ट वृत्तींचा निरोध करावयाचा कसा ? त्यावेळीं माझी आठवण करून त्या वृत्तींचा माझ्यावर मारा करावा. त्या वृत्ति माझ्याकडे वळवाव्या. म्हणजे त्यांचा जोर आपोआप आस्ते आस्ते कमी होईल. त्या वृत्ति म्हणजे आपल्या शरिरांत भिनूं पहाणारें तें वीषच आहे म्हणा ना. त्याचा परिहार होण्यास हेंच एक महत्वाचें साधन आहे. माझ्याकडे तुम्हीं लक्ष लाविलें म्हणजे त्या दुष्ट प्रवृत्ति माझ्यांत लय पावून नाहींशा होतील. गुरू आपल्या सन्निध आहेत. त्यांचा आपल्यावर सतत पहारा आहे याची जाणीव त्या दृष्टीनें तारक होऊन रहाणारी आहे. मग विषयबाधा किंवा उपरोक्त विषाची बाधा आपणांस सहसा होणार नाहीं.

—श्रीसाईसच्चरित्


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] मे १९६३ [ अंक २ रा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्प

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

'साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

कोणीही मनुष्य असो; तो रागाच्या लोभाच्या, अहंकाराच्या किंवा मत्सराच्या आहारीं सहजासहजीं जाऊन आपल्या जन्माचें मातेरें करून घेत असतो. त्यांच्या तावडींतून सुटका करून घेणें माणसाला सहसा जमत नाहीं. वरीलपैकीं प्रत्येक आपला शत्रू आहे. घात करणारा व जीवन मातीमोल करणारा आहे. आपणाला आपलें जीवन शोभवावयाचें आहे. तें सद्गुणसंपन्न करावयाचें आहे. तें वैभवशिखरीं नेऊन बसवावयाचें आहे; परंतु जोंपर्यंत वरील विषारी भुजंग आपल्या सभोंवार विळखा घालून व आपला यशाचा आणि प्रगतीचा मार्ग रोखून बसले आहेत, तोंपर्यंत आपलें जीवन सफल सुसंपन्न व सुंदर होणें शक्य नाहीं.

काम, क्रोध लोभ, मोह, अहंकार व मत्सर वगैरे दुर्गुणापासून सुटका करून घेण्याचे अनेक मार्ग सांगण्यांत आले आहेत. लोक नाना मार्गांचें अवलंबन करून त्या दुर्गुणांच्या तावडींतून सुटका करून घेण्याच्या मार्गांस लागले आहेत; परंतु त्या सर्वांमध्यें साईबाबांनीं सांगितलेला मार्ग खरोखर प्रत्येकानें अवलंबून आचरणांत आणण्यासारखा आहे. बाबा सांगतात कीं तुमच्या मनांत रागाचा उद्भव झाला किंवा तुम्हांला अहंकारानें वा लोभानें पछाडलें तर तुम्हीं माझी आठवण करा. जी विषारी वृत्ति मनांत जागी झाली असेल तिचा माझ्यावर मारा करा. ती वृत्ति मला अर्पण करा. असें रोज करीत जा. आणि मग पहा ती वृत्ति आस्ते आस्ते नामशेष होण्याच्या मार्गांस लागते कीं नाहीं ती! तिचा जोर उत्तरोत्तर कमी कमी होत गेलाच पाहिजे. 'काम, क्रोध, अभिमान। वृत्ति जेव्हां उठती कडकडून। मी एकलक्ष्य लक्षून। मजवरी निक्षून सोडाव्या॥' किती महत्त्वाचा व रामबाण उपाय आहे हा!

या दुष्ट वृत्ति बाबाना समर्पण करणें म्हणजेच त्यांचें अखंड स्मरण करणें. ज्याच्याकडून त्यांचें अखंड स्मरण घडत राहील त्याच्या वाट्यास त्या दुष्ट वृत्ति जातील च कशा? त्या दुर्गुणाचा शिरकाव बाबांनीं व्यापलेल्या त्या मनांत होईलच कशाला!

हा एक अभ्यास आहे. ज्या ज्या वेळीं अंतःकरणांत एखाद्या दुष्ट भावनेचा उदय होतो त्या त्यावेळीं बाबांची आठवण करावयाची. त्यांचें नांव घेत रहावयाचें; तो जप जपावयाचा. आणि या अभ्यासामुळें त्या ज्या दुष्ट प्रवृत्ति त्या आपोआप क्षीण, बलहीन होत जातील. त्यांचा जोर नाहींसा होईल. त्यानीं तुमच्यावर पगडा बसविण्या ऐवजीं त्यांच्यावर तुम्हीं आपला पगडा बसवूं शकाल व त्यांना दाबांत ठेऊं शकाल.

बाबांचें नावच असें प्रभावशाली आहे कीं तें आपला प्रभाव दाखविल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं. बाबा माझ्या सन्निध सदैव आहेत. माझ्यावर त्यांचा पहारा अखंड आहे, मला त्रास द्यायला कोण येतो तें बाबा डोळ्यांत तेल घालून पहात आहेत.

या जाणीवेनें तुम्हीं एकदां कां भारले गेलां, तो आधार एकदां कां तुमच्या हाताला लागला म्हणजे कोणाची छाती आहे तुमच्या जवळपास फिरकण्याची ?

एकदां कां ही सद्‌भावना तुमच्या अंतःकरणांत रुजली, एकदां कां तिनें मूळ धरलें म्हणजे तुम्हीं या जगांत कळीकाळाचेंही भय बाळगायला नको. मग तुम्हीं वरील पैकीं कोणत्याही शत्रूला घाबरण्याचें मुळींच कारण नाहीं. त्या त्या दुष्ट भावना त्या परिसाच्या संगें लोखंडाचें जसें सोनें होतें, त्याप्रमाणें त्यांनाही सद्भावनांचें स्वरूप प्राप्त होईल.

मी लोभ करावयाचा, मी कोणत्या तरी मोहांत सांपडावयाचा किंवा मी कोणत्या ना कोणत्या बाबतींत अहंकार बाळगावयाचा परंतु त्या त्या प्रसंगीं बाबांचें स्मरण केल्यानें, ते दुर्गुण बाबांच्या चरणीं सुपूर्द केल्यानें तुमची निदान त्या त्या क्षणापुरती तरी त्या दुर्गुणांतून सुटका होते कीं नाहीं याचा एकदां अनुभव तरी घेऊन पहा.

वर सांगितलेंच आहे कीं, हा अभ्यास आहे. अभ्यास सतत करावा लागतो. एकदां वाचून भागत नाहीं. परिक्षेंत उत्तीर्ण व्हायचें तर सतत वाचन, सतत अभ्यास व सतत निदिध्यास त्याच त्या गोष्टीचा ध्यावा लागतो. तुम्हीं परिक्षेंत उत्तीर्ण केव्हां व्हाल ? कारण अभ्यास तुका म्हणे.

आम्हांला अभ्यास करायला नको, प्रयत्नशील व्हायला नको. यश मात्र मिळालें पाहिजे. कोणत्याही क्षेत्रांत असो; यशासाठीं अभ्यास पाहिजे, प्रयत्न पाहिजे व सततोद्योग पाहिजे. या जगांत सहज किंवा सुखासुखी कोणतीही गोष्ट प्राप्त होत नाहीं.

तेव्हां कोणत्याही दुष्ट वासनेवर विजय मिळविण्याचा सर्वांत सोपा मार्ग म्हणजे बाबांचें स्मरण व बाबांचें सान्निध्य अनुभविणें, बाबा माझ्या पाठीशीं सदैव खडे आहेत व माझ्यावर त्यांचा सतत खडा पहारा आहे असें मानणे व तें क्षणोक्षणीं अनुभविणें हाच होय.

त्या मार्गानें जाण्याचें भाग्य तुमच्या, आमच्या व सर्वांच्या वाट्याला येवो हीच आमची प्रार्थना.

—संपादक




**श्री.** अण्णाजी मंगेश भट हटंगडी, मु. गदग, पो. गदग हे श्रीसाईबाबासंबंधीं स्वतःस आलेले ताजे अनुभव पुढीलप्रमाणें कळवितात :—

श्रीसाईबाबासंबंधीं आम्हांस आलेल्या अनुभवावरून हें मी लिहीत आहे. तरी साई भक्तांसाठीं आपल्या मासिकांत ही गोष्ट—सत्यकथा—छापावी—मला साईबाबांविषयीं फारशी श्रद्धा नव्हती. पण माझ्या पत्नीची त्यांच्यावर फार भक्ती. कांहीं वर्षांपासून तिची माझ्या मागें कुरकूर होती कीं एकदां शिरडीला जावून येवूं. पण मी मनावर घेतलें नाहीं. दोन वर्षांमागें आम्ही मुंबईला गेलों होतों. तेव्हां परत हिनें शिरडीला जाण्याची गोष्ट काढली. तेव्हां समाधानासाठीं जावूं असा विचार केला व तिकडे जाण्याचा रस्ता, तिकडे राहाण्यासाठीं कोणत्या सोई आहेत ह्याबद्दल चौकशी केली तेव्हां कांहीं जण म्हणाले, "अहो ! तिकडे डांस, मच्छर फार—तुमची प्रकृति नाजूक—तुम्हाला मानवणार नाहीं." झालें. आधीं मला जाण्याची फारशी इच्छा नव्हती—हें ऐकल्यावर बेत रहित केला.

नंतर ४ महिन्यामागें आम्ही काशी प्रयागला गेलों होतों. तेथून मुंबईला काशी एक्प्रेसनें आलों. वाटेंत मनमाड स्टेशन लागलें. स्टेशनवर "Alight here for Shirdi" हा बोर्ड वाचून माझी पत्नी म्हणाली, "आम्ही एथें उतरून शिरडीस जाऊं या का ?" पण मी म्हणालों, "नको ग ! आतां प्रवास फार झाला. आणखी केव्हांही जाऊं."

गाडी मनमाड स्टेशनहून सुटली व लगेच हिला गाडींतच हिंव भरून ताप आला—सडकून ताप भरला. तेव्हां मात्र मी घाबरलों व मनांतच नवस केला कीं मुंबईला जावून एक दोन दिवस थांबून शिरडीला जायचेंच. मुंबईला पोंचलों. हिचा ताप दोन दिवसांनीं गेला व ती पूर्ण बरी झाली. पण शिरडीला गेलो नाहीं; कारण गदगहून माझ्या फर्मच्या भागिदाराचें पत्र आलें कीं मी ताबडतोब निघून यावें व त्यामुळें शिरडीला जाण्याचें तसेंच राहिलें.

गदगला आल्यावर आमच्या फर्मवर ७१००० रु. नफाकर आकारल्याबद्दल नोटीस मिळाली. आमचें वास्तविक टॅक्स २–३ हजार पेक्षां जास्त होत नाहीं. पण

कांहीं गैरसमजुतीनें हा जबरदस्त कर बसवण्यांत आला. गत वर्षीहि अगाच अन्यायानें २५००० रु. कर बसला होता. त्यावर अपील चालू होतें. आणि आतां ही ७१००० रु. कर आकारल्याबद्दल नोटीस. मी हतबुद्ध झालों. आमची सर्व दुकानें विकली तरी रु. ९६००० मिळण्यासारखे नव्हते. काय करावें सुचेना. माझा एक भागिदार तर हार्ट फेल होवून वारला. ( ता. २७–१–१९६३ रोजीं )

हीं सर्व संकटें उभी राहिल्यावर साईबाबानांच शरण गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटलें व त्या दिवसापासून साईबाबांचा धांवा रोज सुरू केला. मनानें, वाचेनें व तसेंच क्रियेनें ( रोजनिशींत रोज रात्रौ झोपायच्या आधीं साईनाथांची प्रार्थना लिहायची क्रिया ) साईनाथांच्या कृपेसाठीं याचना केली.

कानडींत एक म्हण आहे ‘ संकट वंदाग वेंकटरमणा ’ संकट आल्यावर वेंकट-रमण आठवतो. खरें आहे तें. पण तो दयाघन परमेश्वर संकटकालीं आपल्याकडे आला म्हणून भक्ताचा अव्हेर करत नाहीं. पहा लहान मूल असतें. एरव्ही तें आपल्या खेळांत मग्न असतें. आईची आठवणसुद्धां असत नाहीं त्याला. पण कुठें लागलें किंवा पडलें तर तें मूल लगेच आईकडे धांव घेतें. त्यावेळीं आई ‘ चल-येवूं नको माझ्याकडे–एवढा वेळ माझी आठवण सुद्धां नाहीं–आतां गरज पडल्यावर आलास कां ? चल जा–कारट्या ’ असें म्हणते कां ? मुळींच नाहीं– उलट ती प्रेमळ आई म्हणेल ‘ अरे माझ्या राजा–काय झालं–कुठं लागलं माझ्या सोनुल्याला ? ’ असें म्हणून मुलाला उचलून पोटाशीं धरील–व योग्य उपचारकरील– त्याचप्रमाणें गुरुमाऊळी–संकटकालीं शरण गेलं तरी, दयाघन परमेश्वररूपी गुरुमाऊली संकटांत सांपडलेल्यानां रक्षण करतेच.

तसेंच झालें आम्हाला. माझ्या हाकेला, माझे सर्व अपराध विसरून, श्रीसाईनाथ आम्हांला पावला. आमच्या पहिल्या अपीलाचा निकाल पूर्णपणें आमच्या बाजूनें झाला. २५००० रु. कर बसवला होता. अपीलांत “ पूज्य ” शून्य कर बसवला गेला. आमचा वकील एक होता. पण “ ऑर्डर ” मध्यें त्याचें नांवच नाहीं. कारण काय तर मला वाटतें आमचा खरा वकील “ साईबाबा ” पण वकीलपत्र “ साईबाबांच्या नांवानें नव्हतें. म्हणून आमच्या लौकिक वकीलाचें नांवही लिहिलें गेलें नाहीं.

हा आश्चर्यकारक निकाल लागल्यावर शिरडीला जायचा ध्यास मलाही लागला. ८–४–१९६३ दिवशीं निकाल लागला. व आम्ही १०–४–१९६३ दिवशीं शिरडीला जाण्यासाठीं मुंबईस निघालों. यावेळींही कांहीं जणानीं मच्छरांबद्दल भीति घातली. पण मी निर्धार केला होता कीं कांहीं असलें तरी शिरडीला जायचेंच, व निघालों. मी, माझी बायको, व इतर दोन स्त्रिया, अशीं आम्हीं चारजण निघालों. पुण्याहून

बसनें जायचा विचार केला. पुणा बस स्टँडवर आलों पाहतों तर त्या बसला अतोनात गर्दी. आम्ही वेळ नसल्यामुळें जागा रिझर्व केल्या नव्हत्या, व ह्या गर्दीतून आमचा निभाव कसा लागणार असें वाटलें. लोक दांडगाई करून बसमध्यें चढून जागा पकडत होते. पण मी नाजूक प्रकृतीचा व तीन स्त्रिया ! या गर्दीतून जागा कशी पकडणार ही काळजी पण आमची काळजी साईबाबांना होती. 'आज आम्हाला जागा मिळों शक्य नाहीं.' असा विचार करीत सर्व पॅसेंजरच्या मागें आम्ही उभे आहोंत व लोक धक्का बुक्की करीत बस मध्यें चढत आहेत तेवढ्यांत बस ड्रायव्हर खालीं उडी मारून आला व लोकांना मागें हटवून 'या आजोबा तुम्ही चढा आणि जागा पकडा 'असें मला म्हणाला मी चढलों. हा ड्रायव्हर माझा नात्याचा नव्हता किंवा ओळखीचा नव्हता. पण साइबाबांना आमची काळजी होती. एकूण मी बसवर चढलों व एक जागा पकडून बसलों. पण आणखी दोन सीटस् पाहिजे त्या कशा पकडायच्या–गर्दीत बायकांनां येणें शक्य नव्हतें. अशा विवंचनेंत होतों. तेव्हां आश्चर्य पहा कीं एक संपूर्ण बेंच ( दोघांचा ) रिकामा होता त्यावर एवढी गर्दी असून कुणीही बसेना. बेंच पलीकडे असल्यामुळें मलाही आमच्या माणसांसाठीं अडवतां येईना. पण दुसरेही त्यावर बसेनात. जणूं काय तें रिझर्व सीटस होते असें त्यांनां वाटलें असावें. वास्तविक आम्ही तें रिझर्व केले नव्हते. पण आमचीं माणसें येईपर्यंत ( गर्दी कमी झाल्यावर ) त्यावर कुणीही बसले नाहींत. त्यावेळीं आम्हाला वाटलें कीं साईनींच ह्या जागा आमच्यासाठीं राखून ठेवल्या असाव्या. ह्याप्रमाणें आम्ही शिरडीला सुखरूप आलों. यथाकालीं श्रीसाईदर्शन झालें. रात्रीं आम्ही झोपण्यासाठीं खोली घेतली. झोपतांना माझ्या हिनें विचारलें कीं 'मच्छरदानी' देवूं का ? पण मी म्हटलें मच्छर, डांस कांहीं दिसत नाहीं. आतां बांधायची यातायात नको, मग लागल्यास मी बांधून घेईन पण सबंध रात्रीं एकसुद्धां मच्छर दिसला नाहीं. सबंध रात्र गाढ झोंप लागली. सकाळीं उठल्यावर मी म्हणालों, काय लोक तरी ! आम्हाला मच्छर आहेत म्हणून उगीच धाक घातला–एकसुद्धां मच्छर नाहीं, कांहीं नाहीं, लोक शिरडीचें नांव वाईट करतात विनाकारण." माझी पत्नी व इतर स्त्रियाही तसेंच म्हणाल्या कीं मच्छर मुळींच नाहींत. पण ह्यांतली खरी गंमत व साईलीला पुढें आहे. दुपारीं आम्ही परत जाण्यास निघालों. तेव्हां मी आणलेली छत्री वर टांगलेली खालीं काढून हातांत घेतली. घेतल्याबरोबर छत्रींतून भुर्रदिशीं शेंकडों मच्छर–डांस उडून गेले. खरंच साईनाथ–काय ही तुझी लीला अगम्य आहे. लोकांनीं म्हटल्याप्रमाणें डांस होते खरे–पण साईनाथांच्या कृपेनें त्यांनीं आम्हाला त्रास दिला नाहीं. खोलींत आलेला प्रत्येक डांस छत्रींत जाऊन निमूटपणें बसला. जणूं काय साईनाथांची ताकीद होती त्यांना कीं 'बाबारे–हे माझे

भक्त आहेत-नाजूक प्रकृतीचे-त्यांना त्रास देऊं नका. निमूटपणें जा आणि छत्रींत बसा.' अहाहा, काय ही साईनाथांची भक्तांसाठीं कळकळ! ही प्रत्यक्ष घडलेली गोष्ट आहे. छत्रींत ते डांस पाहिल्यावर मला गहिंवरून आलें व मनांत म्हटलें हे साईबाबा किती आमच्यासाठीं तूं काळजी घेतलीस? सद्गुरु साईनाथांचा महिमा असा आहे. ह्या साईनाथांच्या कृपेनेंच वर लिहिल्याप्रमाणें आमची इनकमटॅक्सची पहिली केस संपूर्ण जिंकली. त्यांच्याच कृपेनें दुसरी केसही जिंकणार अशी खात्री आहे.

येथें मी हें लिहूं इच्छितों कीं मी भाविक वृत्तीचा माणूस नाहीं. अंधश्रद्धा माझ्यांत नाहीं. एकेकाळीं देव गुरु साधुसंत अशा विषयांच्याविषयीं मी उदासीन होतों. साईबाबाविषयीं ऐकलें होतें. पण लोक मूर्ख आहेत अशीच भावना होती माझी. हें सर्व लिहिण्याचें कारण कीं वरील चमत्कार हे खरे आहेत. उगीच भाविकपणाचे विचार नव्हेत हें पटवून देण्यासाठींच माझ्या स्वाभाविक मनोवृत्तीबद्दल लिहिलें. ही माझी कैफियतच म्हणा वाटलं तर.

× × ×

## बाबा भक्तांचे कैवारी


श्री. एन्. एस्. सोनार, पोलिस हवालदार डिचोली, गोवा हे लिहीतात कीं,

गेल्या दोन वर्षांपूर्वी अचानकच शीर्डी क्षेत्रीं बंदोबस्तास जाण्याची मला ऑर्डर मिळाली. मी गेली १५।१६ वर्षांपासून पोलीस अंमलदार म्हणून काम करीत आहे. असा बंदोबस्ताचा योग यापूर्वी मला कधीच आला नाहीं. श्री. बाबांची भक्तीही मी यापूर्वी केली नाहीं. तथापी यात्रेंतील चोख व्यवस्था व मंदीराची प्रसन्नता यामुळें माझें मन भारावले जावून त्यानंतर मी नित्य साईबाबांची भक्ती करूं लागलो. अशाच योगायोग्यानें माझें असें पाहाणेंत आले कीं. आमच्या एका साईभक्त अधिकाऱ्यावर दुष्ट लोकांकडून खोटा आरोप रचणेंत आला होता. तो इतका धूर्तपणें व कावेबाज पणानें रचला होता कीं—त्याचे स्वरुप कायदेशीर रित्या लक्षांत घेतल्यास आमच्या सदर अधिकाऱ्याची नोकरीच जाण्याची परिस्थिती उद्भवली होती. तथापि त्याची अढळ श्रद्धा बाबांचे चरणीं असल्यानें त्याची सहिसलामत त्यांतून सुटका झाली. या प्रकारावरून बाबा हें भक्तासाठीं किती तळमळ दाखवितात हें प्रत्ययास आलें.

तथापि याहीपेक्षां अधिक उच्चांक म्हटला म्हणजे तो आमचे बाबतींत असा कीं— म्हणती नित्य साई साई जे। नेईन त्याच भक्तांस ॐ स्वरुपाकडे। ही सत्य असे वचनोक्ति ॥ असें माझ्या बाबतींत झालें. अध्यात्मिक ज्ञानाचें थोडेसे सुद्धां वारें आमच्या अंगावरून यापूर्वी गेलेले नाहीं. तेव्हां मला

ॐ कार स्वरूपाची वाट कशी दिसणार ! तथापि इच्छा दृढ होती. अशांत मागील वर्षी गोव्यांत बदलीची बाबांच्या कृपेनें अथवा पूर्व संचितानुसार माझी नेमणूक झाली. व येथें आल्यावर माझी आवडती ५ वर्षांची मुलगी अपघातानें निधन पावली. ती बाबांची नित्य फोटोपुढें पूजा करावयाची. त्यामुळें माझ्या घरांतील सर्वांस फार दुःख झालें. बाबांची पूजा करतांना फोटोकडे पाहिलें म्हणजे मला मुलीची आठवण होवून रडूं यावयाचें !! त्या डबडबलेल्या नजरेंतून बाबांचे फोटोकडे पाहिल्यावर मला पाहून बाबा हंसताहेत असा भास निर्माण व्हावयाचा. अशा बेचैन परिस्थितींत मला एथें अचानकपणें एका सद्गुरुशी गाठ पडली. नव्हे बाबांच्या आदेशानें त्यांनींच मला बोलाविलें व मी त्यांचा अनुग्रह घेतला. त्यांनीं अध्यात्मिक ज्ञानाची सर्व जाणीव मला प्रेमळपणें दिली. मी व्यर्थ मायाकूल परिस्थितींत शोक करीत आहे. असें त्यांनीं मला समजावूंन सांगितल्यावर व त्यांच्या वरदहस्तानें आमचें दुखः दूर झालें. त्यानंतर मी नित्य ध्यान धारणा करीत असतांना बाबांची तीच पूर्वीची मला पाहून हंसणारी मूर्ती, माझ्या हृदयांत हजर असते. माझ्या सद्गुरुंच्या पूर्ण कृपेनें आतां मी पूर्णसुखी आहे.

असा श्री. सद्गुरु बाबांचा महिमा अपार असून त्यांची लिला आम्ही क्षुद्र मानवांनीं कितीहि प्रयत्न केला तरी त्या लिला आम्हास कळणें शक्य नाहीं. त्यांचे चरणी या दासाचा त्रिकाल चरणीं नमस्कार असो !!



## लहान मुलांच्या आंकडीवर

जुनें आणि प्रसिद्ध औषध

जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल. वडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# गीता आणि संतांचा भागवत धर्म

—संत विनोबा

कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर भगवंतांनीं अर्जुनाला गीता उपदेशिली. तो दिवस मार्गशीर्ष शुद्ध एकादशीचा होता असें विद्वानांनीं ठरविलें आहे. तें खरें धरून चालण्यास हरकत नाहीं. त्यामुळें "मासानां मार्गशीर्षोऽहम्"– महिन्यामध्यें मार्गशीर्ष महिना ही माझी विभुति आहे–ह्या वचनाला विशेष अर्थ येतो. ह्या दिवशीं हिंदुस्थानांत सर्वत्र गीतेचें स्वाध्याय-प्रवचन व्हावें अशी सूचना करण्यांत आली आहे.

ही सूचना योग्यच आहे. पण गीता-धर्माचा प्रचार नुसत्या प्रवचनानें किंवा श्रवणानें होणें नाहीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. गीता हें बोलायचें शास्त्र नाहीं. आचरणाचें शास्त्र आहे. त्याचा प्रचार आचरणाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि उपायानें होणार नाहीं. गीतेचा धर्म हा खुला धर्म आहे. अमक्याला म्हणून त्याचे श्रवण करण्याची मनाई नाहीं. ज्या स्त्री-वैश्य-शूद्रांना वेदांच्या खोल विहिरींतून पाणी काढण्याची शक्ति नाहीं, त्यांना मनमुराद पाणी मिळण्याची सोय गीतेच्या वाहत्या झऱ्यांत होण्यासारखी आहे. गीता-माउलीपाशीं लहान-मोठ्याचा भेद नाहीं, पण खऱ्याखोट्याचा भेद आहे. तपश्चर्या करण्याची ज्याची तयारी नाहीं, ज्याच्या हृदयांत भक्तीचा ओलावा नाहीं, श्रवणाविषयीं ज्याला तळमळ नाहीं किंवा ज्याच्या बुद्धींत निर्मत्सरभाव नाहीं; त्याच्यापुढें हें रहस्य चूकून सुद्धां प्रकट करूं नको म्हणून भगवंतांनीं अर्जुनाला बजावलें आहे.

## राम चिंतीत जावा

गीतेचा प्रचार म्हणजे निष्काम–कर्माचा प्रचार. गीतेचा प्रचार म्हणजे भक्तीचा प्रचार. गीतेचा प्रचार म्हणजे त्यागाचा प्रचार. हा प्रचार प्रथम आपल्या आत्म्यांत झाला पाहिजे. ज्या दिवशीं त्यानें आत्मा परिपूर्ण भरून वाहूं लागेल, त्या दिवशीं तो दुनियेंतहि पसरल्याशिवाय राहणार नाहीं. गीतेवर आजपर्यंत हिंदुस्थानांत प्रवचनें कांहीं कमी झालेली नाहींत. नाना प्रकारच्या टीकाहि लिहिल्या गेल्या आहेत. गीतेच्या तात्पर्यासंबंधीं वर्तमानपत्रांतून वगैरे जुन्या व नव्या शास्त्री–पंडितांचे वादविवादहि पुष्कळ झाले आहेत. पण त्याच्या योगानें साक्षात निष्काम कर्माला कांहीं चालना मिळाली आहे असा अनुभव नाहीं. उलट त्यानें रजोगुणाचा मात्र जोर वाढला. मणभर चर्चेपेक्षां कणभर आचरण श्रेष्ठ आहे. "प्रभातें मनीं राम चिंतीत जावा"

हें वाक्य लिहिणाराचा उद्देश लोकांनीं तें घोकत बसावें हा नाहीं, पण प्रभातकाळीं उठून रामाचें चिंतन करावें हा आहे.

गीतेचें रहस्य गीतेच्या पुस्तकांत झांकलेले नाहीं. तें उघडें आहे. भगवान् स्वतःच सांगतात कीं मी तें सूर्याला सांगितलें आहे. ज्याला डोळे असतील तो तें पाहूं शकतो, इतकें तें उघडें आहे. आणि झांकलेलें असलें तर ते गीतेच्या पुस्तकांत खासच झांकलेलें नाहीं. तें हृदयाच्या गुहेंत झांकलेलें आहे. ह्या गुहेच्या तोंडाशीं दुर्वर्तनाचे दगडगोटे सांचले आहेत. तें दूर करून आंत पाहिले पाहिजे. त्यासाठीं मेहनत करावी लागेल. गीता 'कुरु' क्षेत्रांत सांगितली आहे. संस्कृतांत 'कुरु' म्हणजे कर्म कर असा अर्थ आहे.

कुरुक्षेत्र म्हणजे कर्माची भूमि. ह्या कर्मांच्या भूमिकेवर गीता सांगितली आहे. आणि तेथेंच मेहनतीच्या कानानें ती ऐकावयाची आहे.

## तो केवळ दंभ

पुष्कळांना वाटतें, मिशनरी लोक ज्याप्रमाणें बायबलच्या प्रति फुकट वाटतात, त्याच्यावर प्रवचन करीत हिंडतात, कोणी ऐको न ऐको तोंडाची टकळी चालूच राखतात, तसें आपण गीतेविषयीं केलें पाहिजे म्हणजे आपल्या धर्मांचा प्रचार होईल. पण हा नुसता वहीम आहे. मिशनऱ्यांनीं जो फारच थोडा खरा धर्मप्रचार केला आहे तो त्यांच्यांतल्या कांहीं सज्जनांच्या सेवेचें फळ आहे. बाकीचा त्यांचा धर्म-प्रचार म्हणजे दंभ आहे. पण ह्या दंभानें त्यांच्या कार्यांची हानि झाली आहे. त्यांचें अनुकरण करण्यानें आपल्याला कांहीं लाभ होणार नाहीं.

म्हणून गीता-जयंतीच्या दिवशीं गीतेच्या प्रचाराच्या बाह्य कल्पनेवर जोर न देतां हातून कांहींतरी निष्काम सेवा होईल असा प्रयत्न करावा त्याबरोबर भक्तियुक्त चित्तानें यथाशक्ति गीतेचा पाठ करणें उपयुक्त आहेच.

## संतांचा भागवत-धर्म

भगवत्प्राप्तीसाठीं प्रवृत्त झालेल्या विश्वोद्धारक भागवत-धर्मांचा जय जयकार असो ! साक्षात् भगवंतांनीं गीता-मुखानें उपदेशिलेल्या दिव्य भागवत-धर्मांचा जयजयकार असो ! प्रह्लादादि परम भागवतांनीं आचरलेल्या प्रेमळ भागवत-धर्मांचा जयजयकार असो !

भागवत-धर्म हें वैदिक धर्मांचें अत्यंत मधुर स्वरूप होय. पण ह्या भागवत-धर्मांची आमच्या संतांनीं जी 'मराठी' म्हणजे सुलभ आवृत्ति काढली तिच्यांत मधुरतेची सीमा झाली. संतांच्या भागवतधर्मानें मूळ भागवतधर्मांच्या माधुर्यांत क्रांतिकारक भर घातली आहे.

भागवत-धर्म म्हणजे 'देव, भक्त आणि नाम' ह्यांचा त्रिवेणी-संगम आहे. देव साध्य, भक्त साधक आणि नाम साधन. ह्या तिहींच्या कल्पनांत संतांनीं माधुर्य आणि औचित्य ह्यांची सुंदर जोड घातली आहे.

मूळ भागवत-धर्मातली देवाची कल्पना साधीच आहे. तिच्या आसपास गूढतेचें जाळें मुळींच पसरलेलें नाहीं. पण संतांचा विठोबा, नुसता साधाच नव्हे पण अगदीं भोळा आहे; इतका कीं 'विठोबा' म्हणजे 'विटेवरचा ठोंब्या' असें म्हटलें तरी चालेल. पण ह्या ठोंब्यानें आजपर्यंत जितके दगड तारले तितकें तारण्याचें भाग्य कोणत्याहि 'सच्चिदानंदाला' किंवा 'नित्य–शुद्ध–बुद्ध–भक्ताला' प्राप्त झालेलें नाहीं. संतांच्या कृपेनें अर्जुनाच्या रथावर बसलेली देवता पुंडलिकाच्या विटेवर उभी राहिली. संतांच्या कृपेनें यमुनेच्या कुंजवनांत गोपींना अहोरात्र तिष्ठत ठेवणारा खेळगडी चंद्रभागेच्या वाळवंटांत भक्तांसाठीं अठ्ठावीस युगें वाट पाहूं लागला. संतांच्या कृपेनें तिन्ही भुवनें पोटांत सांठवणारा प्रभु म्हारांपोरांच्या ओठांत सांपडूं शकला. ही संतांच्या कृपेची करामत आहे. तिनें प्रत्यक्ष देव बदलला. आणि देव बदलल्यामुळें दुनियेचा रंग पालटला. रेडे ऋषि, महार श्राद्ध–देव, गाढवावर गंगा, कुंभार कुळगुरु वाण्याघरीं वेद–सर्व सृष्टि चमत्कारमय झाली !

## देवाची धांदल उडाली

जसा संतांचा 'देव' तसाच त्यांचा 'भक्त' बिलकुल सीधा; व्यवहारांत वागणारा पण शुद्ध चित्ताचा, मजुरी करून राबणारा, प्रेमळ, प्रांजळ, सरळ अगदीं अडाणीवरचा पण देवाच्या हातांतला असा 'भक्त' संतांनीं कल्पिला आहे. भक्ता-विषयीं लोकांना वाटणारा 'वाऊ' संतांनीं अजीबात काढून टाकला. भक्त म्हणजे 'सेवावृत्तिचा मजूर' अशी सर्वांना समजण्यासारखी, अनुकरणाला सुलभ व्याख्या झाली. पण त्यामुळें देवाची धांदल उडाली. त्याला आयता नैवेद्य मिळेनासा झाला. नैवद्याबरोबर मजुरीचाहि वांटा थोडाबहुत पत्करणें भाग आलें. जनीच्या घरीं दळण दळूं लागावें तेव्हां नैवेद्याची वानगी मिळावयाची. गोऱ्या कुंभाराची माती मळून द्यावी तेव्हां दुधाच्या प्याल्यानें दर्शन व्हावयाचें. नाहीतर नैवेद्य बंद. पूर्वीं योगाभ्यासाचें तत्त्व होतें. तेव्हां क्षीरसागरावर योगनिद्रेंत घोरत पडण्याची सोय होती. पण आतां योगाभ्यासाऐवजीं अंगमेहनतीचें, मजुरीचें, शरीर-कष्टाचें तत्त्व दाखल झालें. त्यामुळें आयता नैवेद्य मिळण्याची सोय राहिली नाहीं. पण तशी नैवेद्याची रुचीहि वाढली. योग्य मजुरीनंतर मिळालेला नैवेद्य देव आतां प्रेमानें खाऊं लागला.


देवाला घाबरून जाण्याचें कांहीं खास कारण नव्हतें. संत ह्या थरावर गोष्ट आणणार इतकी स्पष्ट नसली तरी अंधुक कल्पना त्याला असली पाहिजे. म्हणूनच

भागवत-धर्माच्या जुन्या आवृत्तीच्या वेळीं, त्यानें मजुरीचा थोडाफार अभ्यास करून ठेवला असावा. गाई राख, गोठा साफ कर, उष्ट्या पत्रावळी काढ, घोड्यांना खरारा कर वगैरे पुष्कळच कामें त्यानें करून पाहिली होती. पण संतांनी त्याचा हा नित्याचा कार्यक्रम ठरवून टाकला एवढेंच.

## देव सारावे परते

देव आणि भक्त ह्यांना जोडणारा सांधा म्हणजे नाम. नाम खरें. पण कोणाचें? हा प्रश्न वैदिक काळापासून विचारला गेला आहे. '**कस्य वयं मनामहे चारु नाम**' —कोणाच्या मधुर नामाचें आम्हीं चिंतन करावें?—संतांचें उत्तर असें. 'देव आणि भक्त दोघांच्या नामाचें चिंतन करावें. पण आधीं भक्ताच्या नामाचें करावें.' '**देव परते सारून**' भक्तांची पूजा आधीं केली पाहिजे असें संतांच्या भागवत-धर्मांचें कलम आहे. ह्यांत मधुर औचित्य आहे. ज्या न्यायानें 'सच्चिदानंदा'पेक्षां विटेवरचें ध्यान श्रेष्ठ ठरलें, त्याच न्यायानें विटेवरच्या ध्यानापेक्षां विटेसमोरचें ध्यान श्रेष्ठ कां नव्हे? 'ग्यानबा तुकाराम' ह्यांत जी जादू आहे ती 'विठोबा रखुमाई' मधें आहे काय?

आषाढी एकादशीच्या पवित्र दिवसाच्या निमित्तानें भागवत-धर्मांविषयीं सहज सुचलेले चार विचार लिहून टाकले. ते देवाला अर्पण करून मोकळा होतों



॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

**महिला वस्तु भांडार**

**भरतकाम, विणकाम, शिवणकाम**

यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें लोकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधनांचे व्यापारी.

**छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)**

*** आमची कोठेंही शाखा नाहीं. ***

# नरहरी व नामदेव

# द्वैतभावाचें निराकरण

एका परमेश्वरानेंच उत्पन्न केलेल्या जगतांत परमेश्वराच्या अनेक पूज्य विभूति वास्तव्य करीत असल्या तरी या सर्व विश्वाचा मालक असा परमेश्वर एकच आहे. हा सर्व सिद्धांतांचा मुख्यार्थ दिसतो. आपापल्या भावनेप्रमाणें मनुष्यें आपापलीं निरनिराळीं दैवतें ठरवून व्यर्थ अभिमान धरितात हें त्यांना खरें आत्मज्ञान होईपर्यंत समजत नाहीं. या अज्ञानामुळेंच शैव, वैष्णव, गाणपत्य, शाक्त असे अनेक भेद उत्पन्न झालेले आहेत. संसारी पुरुषाच्या हृदयांत जशी सर्वत्र भेदभावाची व्याप्ति दिसते त्याप्रमाणें परमार्थप्राप्तीच्या नादी लागलेल्या अधिकार-संपन्न पुरुषांच्या ठिकाणींही अभिमान-जनित भेदभाव वास्तव्य करितो. मात्र, त्यांचा भेदभाव सात्विकी असल्याकारणानें त्यांच्या भेद-भावास परमेश्वर मोहून जाऊन त्यांचा द्वैतभाव नष्ट करण्याच्या कार्यानें परमात्म्याच्या लीलांनीं समभावाचें तत्व अज्ञजनांच्या प्रत्ययास येतें. एका उपास्य दैवताच्या ठिकाणीं अनन्य भाव ठेविला तरी द्वैत-निर्मूलन केल्यावांचून खरें हित साधणार नाहीं, हा सिद्धांत सार्थ व्हावा म्हणूनच नरहरी सोनाराचें चरित्र घडून आलें असावेसें वाटतें. हा नरहरी सोनार पंढरीत राहत असून तो शंकर-भक्त होता त्यानें आपल्या अनन्यभावानें श्रीशंकरास प्रसन्न करून घेतलें होतें. तो शिवावांचून अन्य देवास पूजीत नसे. इतकेंच नव्हे तर गणेशचतुर्थीला चंद्राचें दर्शन मुद्दाम टाळणाऱ्या माणसाप्रमाणें तो पंढरींत राहूनही विठोबाचें दर्शनाचा अत्यंत कंटाळा मानी. नरहरी विठ्ठल मंदिराच्या शिखराचें दर्शन घेण्यासही नाखुषी होता. तरी पण तो सांभ-भक्त होता, ही गोष्ट श्रीपांडुरंगास अवगत होती. भेदबुद्धी भक्ताहून समभावी परमात्म्याची बुद्धि फार वेगळी असल्यानें विठोबाला नरहरीच्या भेटीची इच्छा उत्पन्न झाली. नरहरी शंकराचा पुरा भक्त होता हें खरें; पण त्याचें ज्ञान पूर्ण झालें नसल्यामुळें त्याला हरिहरांत भेद वाटत होता. हरिहरामध्यें तिळमात्रही भेद नाहीं ही गोष्ट जगाच्या प्रत्ययाला आणून देण्याला फार चांगली संधि आली आहे असा विचार करून पांडुरंगांनीं एका सावकाराकडून आपणास नवस करून घेतला. त्या सावकारानें पुत्रप्राप्तीची प्रार्थना करून आपल्याला मुलगा झाल्यास विठोबाला कटिसूत्र बांधण्याचा नवस केला. त्याच्या नवसाला पांडुरंग तेव्हांच पावले. त्यानें नरहरी सोनारास रत्नजडित असें सोन्याचें कटिसूत्र घडण्यास सांगितलें. नरहरीनें अदमासानें लांबी धरून तसें सूत्र तयार केलें. सावकार तें कटिसूत्र विठोबाला

बांधू लागला तों तें कमी येऊं लागलें. सावकारानें नरहरीकडे येऊन ते मापाप्रमाणें लांबवून घेतलें. पुन्हां देवळांत जाऊन कटीसूत्र बांधून पाहतों तों तें यावेळीं जास्त लांब होऊं लागलें. तो सावकार पुन्हां नरहरीकडे येऊन त्याला ती हकीगत सांगू लागला. नरहरीनें पुन्हां तें कमी करून दिलें. सावकार पुनरपि देवळांत गेला तों तें कटिसूत्र आखुड भरूं लागलें. त्या, सावकारानें देवळांतून सोनाराकडे व सोनाराच्या घराहून देवळाकडे अनेक हेलपाटे घातले. प्रत्येक खेपेस तें कटिसूत्र आखुड किंवा लांब असें भरूं लागलें. तेव्हां त्या सावकारानें नरहरीनें स्वतःच राउळांत येऊन कटिसूत्र बरोबर करून द्यावें म्हणून त्याची हात जोडून प्रार्थना केली. नरहरीनें ती गोष्ट मान्य केली. पण आपण एका शंकरावांचून अन्य दैवत दृष्टीनें देखील पाहत नाहीं असें आपलें व्रत असल्याचें नरहरीनें सांगितलें आणि डोळे बांधून देवळांत येण्याबद्दल सावकारास कबुली दिली.

## मुगुटाऐवजीं जटाभार

सावकारानें नरहरीला हातीं धरून विठ्ठलासंन्निध नेलें. नरहरी आपल्या हातांनीं पांडुरंगास चांचपून पाहूं लागला. तों त्याच्या हातास मुकुटाच्या ऐवजी जटाभार लागला. विठोबास एकाच्या ऐवजीं पांच तोंडें असून दहा हात आहेत; वैजयंतीच्या ऐवजीं गळ्यामध्यें रुंडमाला आहे; असें त्याच्या स्पर्शानुभवानें समजून आलें. या चिन्हावरून त्या देवळांत विटेवर पांडुरंगाच्या ऐवजीं आपलें आराध्यदैवतच उभें आहे अशी खात्री वाटून त्यानें दर्शन घेण्याकरितां डोळे मोकळे केले तों विटेवर पांडुरंग मूर्तीच उभी आहे असें प्रत्ययास येऊन त्यानें पुन्हां डोळे बांधिले आणि तो कमरेचें माप घेऊं लागला. देवाला स्पर्श होतांच पुन्हां त्याला श्रीशंकराचीच सर्व लक्षणें भासूं लागलीं. पुनरपि त्यानें नेत्र उघडले तों आपली विठ्ठलमूर्ति कायम ती कायमच. हा चमत्कार पाहतांच नरहरीस अनुताप उत्पन्न होऊन त्यानें श्रीविठ्ठलास साष्टांग नमस्कार घातला. आपला द्वैतभाव घालविण्याकरितांच परमेश्वरानें हें माया-लाघव केलें अशी खात्री होऊन तो अभेदभावी बनला. त्याची समस्थिति कळतांच पांडुरंगांनीं त्याला प्रत्यक्ष भेट देऊन कुरवाळिलें. त्यानेही प्रभुचरणास मिठी मारिली. दासांचा मनोभंग होऊ नये म्हणून त्यावेळेपासून पाडुरंगांनीं आपल्या मस्तकावर सदैव शिव-लिंग धारण केलें.

## द्वैत निरसन झालें

नामदेवांनीं समाराधना केली तेव्हांही हा नरहरी त्याठिकाणीं भोजनास प्राप्त झाला होता. नरहरीचें द्वैत-निरसन झालें त्याचप्रमाणें नामदेवाचें द्वैतखंडण होण्याकरितां परमेश्वरानें त्याला विसोबा खेचराकडे पाठविलें होतें. त्याचा अनुग्रह झाल्यानंतर नामदेवाची कसोटी पाहण्याकरितां देवानें कांहीं माया-लाघव केलें.

एका द्वादशीला यात्रा भरली असतांना पांडुरंगांनीं श्वानरूप धारण केलें. यात्रेकरू संतलोकांत कोणी स्वयंपाक करीत होते; कोणी जेवावयास बसले होते. श्वानरूपी पांडुरंग कोणाच्या कणकेंत, कोणाच्या तांदुळांत तोंड घालूं लागले. जो तो कुत्र्याला दडांवून पिटाळूं लागला. कोणाचाच भाव सर्वांभूतीं सम नाहीं असें पाहून त्या श्वानानें नामदेवाच्या अन्नांत तोंड घालून एक पुरी पळविली. त्या निश्चलभावी विष्णुदासानें तें हरिरूप ओळखलें आणि कोरड्या पुरीनें भगवंताचें पोट दुखेल असें मानून तो हातांत तुपाची वाटी घेऊन त्या श्वानाच्या पाठीस लागला. सर्व संतही नामदेवाची टवाळी करूं लागलेसें पाहून त्या श्वानानें नामदेवास त्यानें आपल्याला कसें ओळखलें याविषयीं प्रश्न केला. त्यावर नामदेवानें उत्तर दिलें कीं, 'सद्‌गुरु विसोबाखेचरांनीं दिलेल्या उपदेश ज्ञानाच्या सामर्थ्यानें मीं आपणांस जाणिलें.' हें उत्तर ऐकून परमात्मा संतुष्ट होऊन अदृश्य झाले. हा संवाद ऐकून सर्व संतांना पश्चात्ताप वाटला. आपणाला दर्शन देण्याकरितां पांडुरंग श्वानरूपानें प्राप्त झाले असतां आपण त्यास हाकून लाविलें म्हणून सर्वांना हळहळ वाटून ते नामदेवाचे गुण गाऊं लागले.


## नामदेवाचा निर्धार

सर्वत्र अभेद बुद्धि झाली असल्यानें नामदेव कर्मसंन्यासी बनला होता; तरी तो आपणास भागवत म्हणवीत असल्यानें तो एकादशीचें व्रत निश्चयानें करीत असे. एका कार्तिकी एकादशीला पांडुरंगांनीं स्वतः नामदेवास जेवणाचा आग्रह केला तरी तो भक्तशिरोमणी आपला व्रत–निश्चय सोडीना. तेव्हां देवांनीं आपला हट्ट सोडून एकादशीव्रताच्या निर्धाराचीच तारीफ केली; आणि प्राणसंकट ओढवलें तरी एकादशीचा त्याग न करण्याबद्दल नामदेवास बजावून देव अदृश्य झाले. मेंढरांच्या कळपांत वाघाला बांधिलें असतां तोही कदाचित् आपला स्वधर्म सोडील पण आपण एकादशीच्युत व्हावयाचें नाहीं असें नामदेवानें उघडपणें बोलून दाखविलें.

नामदेवाचा निर्धार अचल आहे कीं, नाहीं हें पाहण्याकरितां पांडुरंगांनीं कांहीं दिवसांनीं एका हरिदिनीच्या प्रसंगीं वृद्ध ब्राह्मणाचा वेष घेऊन नामदेवाच्या घरीं गमन केलें. नामदेवानें ब्राह्मणाचा सत्कार करून इच्छा विचारिली. ब्राह्मणानें अन्नदान मागितलें. एकादशीला अन्नदान करणें बरें नव्हे असें सांगून नामदेव त्या वृद्धाला खजूर, केळी वगैरे देण्यास सिद्ध झाला. ब्राह्मणानें त्याचा प्रतिकार करून व्याकुळपणानें अन्नाचीच वांछा दर्शविली. नामदेव अन्न न देईल तर आपला येथेंच अंत होऊन नामदेवाच्या डोक्यावर ब्रह्महत्त्येचें पातक पडेल, असें सांगून त्या ब्राह्मणानें नामदेवास पापाची भीति घातली. आपण स्वतः प्रीति, आशा, पुण्य, मान सुख, यांच्या पार असल्यानें वियोग, निराशा, पाप, अवमान, दुःख यांचें आपणांस भय नाहीं असें सांगून नामदेवानें त्या ब्राह्मणास फलाहार स्वीकारण्याची विनंति केली. त्या ब्राह्मणानें

फलाहार नाकारून भूतदयेवर मोठे व्याख्यान केलें आणि गरगरा डोळे फिरवून तात्काळ प्राण सोडिला. आपल्या निश्चयामुळेंच या ब्राह्मणाचा अंत झाल्यें वाटून नामदेवानें त्यां ब्राह्मणाचें प्रेत स्मशानांत नेलें; सरणावर तें प्रेत ठेवून नामदेवही त्यांच्या शेजारीं चितेवर निजला आणि त्यानें ती चिता पेटवून घेतली. त्या ब्राह्मणरूपी श्रीपतीसमवेत नामदेवाची श्रद्धारूपी भार्या सती चाललेली पाहून सर्व नारीनरांना आश्चर्य वाटलें. चिता पेटून वैश्वानर प्रदीप्त होतांच तो वृद्ध ब्राह्मण उठून बसला. त्यानें आपलें चतुर्भुज रूप प्रगट केलें आणि नामदेवाला उठवून पोटाशीं घट्ट आवळून धरिलें. देव-भक्ताच्या प्रेमालिंगनप्रसंगीं पांडुरंगानें स्वतः बोलून दाखविलें कीं "नामदेवा, त्रिभुवनांतही तुझ्या तोडीचा भक्त नाहीं. अंबरीष, रुक्मांगद यांच्याहून तुझा महिमा अधिक आहे. त्यांतून कोणी आपली नगरीच वैकुंठास नेली पण तूं विश्वाचा उद्धार केलास. मी अंबरिषाकरितां दहा गर्भवास सोशिले; पण हा माझा बौद्धावतार असतांना तूं मला देह नसतांना सगुण बनवून बोलावयास लाविलेंस. तेव्हां तुझी महती माझ्यानें वर्णन करवत नाहीं." अशा आशयाचें भाषण करून परमात्मा अदृश्य झाले.

माया-लाघव करून परमेश्वराला नरहरी सोनाराचें जें अद्वैत खंडावें लागलें त्या अद्वैताचा नामदेवाच्या ठिकाणीं लेशही नाहीं, असें अनुभवास येऊन सर्व सात्विकी लोक नामदेव शिष्याच्या भजनीं लागले.



देशाचें संरक्षण, देशाचा मान व देशाचें कल्याण साधणें हेंच आपलें पहिलें व महत्वाचें कर्तव्य आहे.

तुमच्या हाताखालीं जीं माणसें कामकाज करीत असतील त्यांचें संरक्षण, त्यांचा मानसन्मान व त्यांचें कल्याण हें तुमचें दुसरें कर्तव्य.

तुमची विश्रांती, तुमचें सुख व तुमचें संरक्षण सर्वांच्या शेवटीं अगदीं सर्वांच्या शेवटीं आणि नेहमीं शेवटींच.

—फिल्ड मार्शल फिलिपचेटवुड

# सद्‌गुरूची कास धरा

—श्रीनिसर्गदत्त महाराज

**श्रीनिसर्गदत्तमहाराज हे सध्यांच्या काळांतील एक सत्पुरुष असून त्यांनीं सद्‌गुरू महात्म्यावर दिलेल्या एका प्रवचनांचा सारांश आमच्या वाचकांसाठीं पुढें देण्यांत येत आहे. "तुम्हीं निर्भय व्हा. शरीर हें सुखाचें गाठोडें आहे. पण त्यांतील आत्मस्वरूपाला ओळखलें तर मात्र तेंच मंदिर होईल." हा संदेश त्यांनीं या प्रवचनांतून दिला आहे.**

**आत्मत्त्वीं नसे विकारवार्ता । स्वयें चेष्टेना चेष्टविता ।**
**चंचल स्वभावें न चळे स्वतः । आणी चळण तरी झालें ॥ २७० ॥** सदाचार

येथें चेष्टा ना चेष्टविता, तुम्हांस हा अनुभव आंगातूक भोगतो आहे. पूर्वी हा आत्मभाव-तुम्ही आहांत असें, भोगत नव्हता. तुम्ही असल्याची जाणीव जाणवली ही चेष्टा, वार्ता जाणवत नव्हती हें नि चेष्टा चळवली, चळली म्हणजे चेष्टा, उगा असलेला तो चळला, हालवत नसलेला तो हालला. भ्रांतीच्या पोटीं भ्रांतीचें दर्शन, चेष्टा शब्दाचा अर्थ व विकार शब्दाचा अर्थ निंदा-व्यंजक आहे, म्हणून हा आरोप आल्यावर म्हणजे आपणांवर येतो. चेष्टा व विकार या शब्दाचा अर्थ अज्ञानांतून लागतो. विकारांतून आकार व विकार म्हणजे चेष्टा. निजचेष्टेतून या अनेक चेष्टा आहेत. आत्मा निर्विकार, चेष्टारहित आहे. तुमचा तुम्हांला अनुभव येऊन जो भोगतां तो कांहीं केल्या सोडूं मागत नाहीं. म्हणजे निचेष्ट स्वरूपाला चेष्टास्वरूप येऊन त्यानें तुम्हास तुम्हा असल्याचें जाणवलें. निचेष्ट स्वरूपाचें भान तुम्हांस न राहिल्याकारणानें, चेष्टेतून जें, जें चेतवतें-बरें किंवा वाईट-कळण्यांतून जें कळते त्यांतून तुम्हीं आपणांस मानतां तें सर्व मिथ्या आहे.

जसा एखादा प्रांत कोणीं पाहिलेलाच नाहीं. परंतु त्या प्रांतात बखेडा (तंटा) उत्पन्न होऊन जर त्याच्यावर आरोप आला तर तो आरोप, तो कसा मान्य कारणार? कारण त्या प्रदेशांत केव्हांच गेलेला नव्हता. तुमची वस्तुस्थिती अशी झाली पाहिजे. या नाना आरोपानी तुमचे स्वरूप माखलेले आहे तोपर्यंत कोट्यावधी संख्येनें कोट्यावधी वेळां तुम्हांस मरणभय आहे. हा विकार निर्विकार अशी तुम्ही जर तुमची खात्री करून घेतलीत तर मरणभय नाहीं; पण ती खात्री करून घेतली नाहीं तर मात्र मरणभयाची पोटदुखी पोटशूळ तुम्हांस मारतच राहाणार.

आपण आहे या विकाराचा अर्थ—तसेंच चेष्टेचा अर्थ मीठ मसाला लावून सांगण्याची गरज नाहीं, प्रत्येकास माहितच आहे. जें निचेष्ट आहे तें परब्रह्म, परमात्मा. पण हें त्याच्या योग्यतेचें नांव आहे, स्वरूपाला नांव नाहीं. आत्म-त्याच्या स्वरूपाला नांव नाहीं कारण कोणासहि दिसणारें रूप नाहीं. रूप म्हणजे स्वरूप व स्वरूप म्हणजे आपण. परमात्मा परमेश्वर हे योग्यतेचें नांव आहे. त्याची योग्यता, चार वाणींत, गायत्रींत बसत नाहीं; अशी जाणत्याची योग्यता आहे. तुम्ही जाणतां, पण तुम्ही जाणतां असा शब्दप्रयोग वापरल्यावर तुम्ही निर्लज्ज वस्त्रास ( देहरूपास ) हात घालतां तो किंवा ती—असा व्यक्तिस्वरूपाचा उल्लेख घेतां भगवती, माया जरी म्हटलें तरी आधार देह अलंकारच आहे. जाणता म्हणजे परमात्मा; तुमचा उल्लेख करतांना तुम्ही निर्लज्ज वस्त्राचा ( देहाचा ) आधार घेतां व जोपर्यंत तसा आधार घेणार तोंपर्यंत नाना चेष्टेचे भय तुम्हांस वाटणारच व कोट्यवधी युगें जरी आलीं व गेलीं तरी मरणभय असणारच. सत्यस्वरूप निर्विकार आहे. देह आकार सत्य मानल्यामुळें पापपुण्याचा दोष लागतो. हा त्रिशूळ ( देहरूपी ) ठेविला आहे. तो तुमच्या अंगांतून काढण्याकरितां हे सद्‌गुरुस्मरण आहे. तुमच्या आत्मविश्वासाची पात्रता तुम्ही जोंपर्यंत उघडी करून घेत नाहीं तोपर्यंत सद्‌गुरुविश्वासास तुम्ही पात्र होणार नाहींत. तुम्ही असल्याची ज्ञान जाणीव या भ्रांतीतील विकाराने विकारल्यानंतर देह अलंकाररूपी झाली अशी तुमची प्रत्येकाची पूर्ण खात्री आहे. [ही खात्री म्हणूजे हा देह अहंकार जपतपादि साधनानें जाणार नाहीं. १३ कोटी जपानें राम भेट होते एवढेंच नव्हे तर २५ कोटींचा जप केल्यानें मी जपी, तपी असा अभिमान उलट दृढच होईल. वस्तु-स्थिती अशी आहे कीं नकळत भोगावें लागलेले आत्मस्मरण निर्विकल्प, निःसंकल्प आहे; परंतु स्वप्नामध्यें काय गोष्टी दिसाव्या व काय दिसूं नये; यास जसा कायदा नाहीं त्याप्रमाणेंच ज्याचा उपयोग करून तुम्हीं उपकार करतां ती एक मनोनलिका आहे, ती मनोनलिका आपल्याबद्दल ( स्वतः बद्दल ) व दुसऱ्याबद्दल काय म्हणेल ते कांहीं सांगतां येणार नाहीं. ती मनोनलिका काय शंका घेईल किंवा कोणाशीं काय नातें स्वीकारील तें सांगतां येत नाहीं. तुमची जेव्हां चित्तशुद्धि होईल तेव्हां तुम्हांला मनाचा त्वेष येईल. तुमचा विश्वास जेवढा जेवढा पवित्र होत जाईल तेवढा तेवढा तुमचा मनावरील विश्वास उडेल, मग मनास आपल्या कह्यांत ठेवावे कीं न ठेवावें हें तुम्हांस समजेल.

चित्त थोडेंसे शुद्ध व स्थिर होऊं लागल्यावर या मनोवाहिनी कशा वाहतात हें 'जाणता' पहातो. जाणता हा शरीराच्या मापाचा—स्थूल शरीर—तो नव्हे. जाणता हा अंतःकरण पंचकहि नव्हे. तुम्ही उगाच बसलांत व मनोभावाचा जो

अनुभव येतो. तें दिवसा पडलेले स्वप्न, स्वप्नास कायदा नाहीं. आत्मा निर्विकार आहे. हें आम्हांला सिद्ध करावें लागते. नको त्या गोष्टींत ही सगळीच ओळख मारवलेली आहे. स्थूल देह हें जाणत्याचें स्वरूप नव्हे; त्यावर पडदा पडतो–त्यास कारण देह म्हणतात. ज्यास तुम्ही झोंप म्हणतां–परी हें जाणत्याचे स्वरूप नव्हे. जाणता हा तुमच्यां वेगळा नाहीं, परंतु जाणत्याचें ते ज्ञाता म्हणून मोकळें असलेले पवित्र, अचल, अढळ असलेलें स्वरूप तुम्हीं देह नात्यानें वापरतां, झोंपेला कारण देह म्हणतां **कारण देहाचें** दर्शन तुम्हांला आवश्यकच असेल तर जरूर होईल. स्थूल, सूक्ष्म देहाचेंहि दर्शन तुम्हांस होईल; पण महाकारण तो चौथा देह, ज्याच्यावर या तीन अवस्था–जागृती, स्वप्न, सुषुप्ती–अवलंबून आहेत. त्यांचेहि दर्शन तुम्हांस घडेल, पण तुमचा तसा आग्रह पाहिजे. हें महाकारण एकल्याच्याच विचारांचा सांठा, तसेंच एक व अनंत ब्रह्मांडे यांच्या युक्तीचा तो सांठा आहे, परी तेंहो ज्ञात्याचें स्वरूप नव्हें. ज्ञाता म्हणजे तुम्ही परंतु सांप्रत तुम्हीं ओळखीला आधार देहाचा घेतां त्याप्रमाणें तुम्ही नव्हेत.

ज्ञाता तुर्या सांडूनी पळाला म्हणजे महाकारण त्यांनीं पाहिलें. तो ( ज्ञाता ) त्या वेगळा झाला; मग या चेष्टा व कुचेष्टा विरहीत आहे. आपण आहे. असें चेष्टीत झाले आहे. याचा अनुभव होण्याकरितां विकारांत चेष्टविलें, अशी तुमची खात्री आहे ती गेली पाहिजे.

तुमचे स्वरूप कोणासही चेष्टवीत नाहीं, आतां तें स्वभावानें चंचल नाहीं, स्वरूपानें चळत नाहीं, परंतु तें चळण झालें असा अनुभव येतो, असें शंकराचार्य म्हणतात. वस्तुस्थिती अशी आहे कीं ज्ञात्याचे स्वरूप येत नाहीं वा वा जात नाहीं, त्याकरितां दृष्टांत गाढ झोंपलेला असतांना स्वप्न पडलें त्यांत तो तीन वर्षांचा बालक होऊन १०० वर्षांच्या आयुष्याचा अनुभव, गोष्टी, घडलेल्या पहातो, तो इतिहास त्यांच्या लक्षांत राहातो परंतु जागा झाल्यावर पाहातो तर तो जेथें पहुडला होता तेथेंच आहे. तो चळलाच नव्हता. मग तीन पावलें तरी चालणार कसा ?

ज्ञानी व अज्ञानी यांत भेद काय ? अज्ञानी हा न घडलेली गोष्ट आपण स्वतः केली किंवा त्यांच्या हातून घडली असें मानतो. पुष्कळ केलें, पुष्कळ घडलें परंतु तें आपण केलें वा आपणाकडून घडलें, आपण करविलें हें ज्यास मान्य नाहीं तो ज्ञाता. ज्ञाता हा नव्हे स्त्री वा पुरुष. स्त्री वा पुरुष हा उल्लेख घेतांना तुम्ही निर्लज्ज वस्त्राला ( देहाला ) अनुसरून घेतां, देहावर कपड्याचे आच्छादन टाकलें नाहीं तर बाहेर हिंडण्याफिरण्यास शरम वाटते. म्हणून देहाला आम्हीं निर्लज्ज वस्त्र असें म्हणतो. तुमचे स्वरूप असें दिडीस वा बेशरम आहे काय ! नाहीं. तुमचें स्वरूप म्हणजे जाणत्याचे स्वरूप. तें केवळ निष्क्रिय आहे; अढळ आहे, वाहते

आहे. अटल म्हणजे टळत नाहीं तें तुमचें जिणें, तुमचें अस्तित्व–तुमची वस्ती ज्यास परमार्थ शास्त्रांत 'वस्तुस्थिती' म्हणतात तें स्वरूप अटळ आहे त्यावर चतुर्विधा, त्रिविधा वा अनेक पटीनें हा अनुभव उमटत राहिला आहे. तुम्हीं आहांत ही जाणीव उमटून तशी ती असल्याची गोष्ट तुम्हांस पटली आहे. गोष्ट सत्य आहे परंतु निर्लज्ज वस्तीनें ते सत्य पटकाविले आहे. हे लाजिरवाणें निर्लज्ज जें झांकल्या शिवाय एकमेकांसमोर नाचावयास नको, असें निर्लज्जस्वरूप मी नव्हे. मी अटळ अढळ आहे त्याकरितां–निर्वाहाकरितां–भावआनंदाचीहि गरज नाहीं, त्याच्या सुखाला भाव नाहीं. हजार वा कोटि रुपये माझे हा सुद्धां सुखाचा भाव आहे. ज्ञात्याच्या **सुखाला भाव नाहीं, ज्ञात्याच्या स्वरूपाला मोल नाहीं.** जें अनमोल आहे, अमोलिक आहे, असें आपणाबद्दल आपल्यास ( स्वतःबद्दल स्वतःस ) हळूहळू वाटत राहिलें पाहिजे.

तुमचा तुमच्याबद्दलचा जो निश्चय होईल तोच तुमच्या कामास येणार आहे. ही अनन्य भक्ती व तिचें दर्शन सत्स्वरूप आहे. निर्धावलेल्या प्रतिज्ञेनें, स्वस्वरूपाच्या दर्शनानें प्रत्यक्ष राहावें, स्वच्छ राहावें अशी आत्मविश्वासाची प्रौढी पाहिजे पण ती काल्पनिक नव्हे, ती प्रतिज्ञापूर्वक आहे; ज्ञात्याचे स्वरूप केव्हांहि नष्ट होणार नाहीं व अज्ञात्याचे स्वरूप कधींहि राहाणार नाहीं.

तुम्ही ज्ञाता होऊं नका कारण तुम्ही ज्ञाता आहांतच जर तुमची तुमच्याबद्दलची तिळभर खात्री नसती तर अमका तमका. आप्तस्वकीयांदिक, देवदेवादिक, धर्म कर्मांदिक, या सर्व चेष्टा, कुचेष्टा आहेत.

देहाच्या विश्वासानें आपण अमका वा तमका म्हणून जगणें व जगविणें हा नरकवास, कुंभीपाक आहे. या कुंभीपाकांत कितीतरी प्रकारची घाण भरलेली आहे. तरीपण ज्ञात्याच्या स्वरूपाला ती घाण स्पर्श करूं शकत नाहीं. तुम्ही ज्ञाता निर्विकल्प आहांत, तुमच्या स्वरूपांत कल्पना नाहीं. आजपर्यंत तुमचे स्वरूप हाललें नाहीं वा चळलेलें नाहीं. ज्ञात्याच्या स्वरुपावर तुम्ही असल्याचें ज्ञान, जीव आत्म प्रभा, परमात्म प्रभा म्हणतात ती प्रकाशली आहे. तें ज्ञात्याचे स्वरूप पुर्वी होतें, आतां आतां आहे व पुढेंहि आहे तेथेंच राहील; परंतु निर्लज्जवस्त्र ( देहाकार ) आपण, रोगी आपण, अशी अधोगतीला गेलेली कल्पना घेऊं नका. ज्ञाता मंगलाचें मंगल आहे; ज्ञाता हें स्वरूप एकलें एक आहे.

ज्ञात्याच्या स्वरूपापुढें अवतारिकांची किंमत नाहीं. ही ऐकलेली हकीगत वरच्यावर आठवींत गेल्यानें परमभक्ति घडेल. मग वरच्यावर ज्या वांकुल्या दाखविल्या जातात त्या सद्गुरूस्मरणानें टरकतील, तेथें काळसुद्धां टरकतो. ज्ञात्यासी भय करूं नका.

मिथ्या वातीसहित काळ आपणच नष्ट होतो. तुमचें सद्गुरूस्वरूप लखलखायमान आहे. ज्ञाता निश्चळ, निर्मळ आहे. ज्ञात्यानें स्वस्वरूपाचा–सत स्वरूपाचा–निश्चय भार्षेत अभिजात ) जरूर घ्यावा. तुम्ही असल्याचें ज्ञान कित्येक मासीं–दिवसाचें म्हणजे मासलेवाईक आहे; पण हें तुमचे प्रत्यक्ष स्वरूप नव्हे. ज्याला आम्हीं परब्रह्म परमात्मा म्हणून समजतो त्या प्रत्यक्ष स्वरूपाचें स्मरण असावें.

शिष्याचा एकनिष्ठ भाव गुरुवचन प्रतिपाळण. ज्याचा निश्चय आपल्या सद्गुरु स्वरूपावरून खालीं उतरत नाहीं तो एक भाव आहे, तो तसाच राहाणार आहे; परंतु मध्यें तुम्हीं निर्लज्जवस्त्रास हात घातलांत तर मात्र भय आहे.

तुम्हीं निर्भय व्हा. शरीर हें सुखाचें गांठोडें नसून दुःखाचें गांठोडें आहे. पण त्यांतील आत्मस्वरुपाला ओळखलें तर मात्र तेंच मंदिर होईल. या ऐकलेल्या गोष्टीचें स्मरण ठेवा. अन्य बातमीचें विस्मरण होणार. प्रत्यक्ष द्विधा नसून एकविध आहे. तेथें स्मरण–विस्मरण नाहीं. सद्गुरु विश्वासाविना आत्मविश्वास नाहीं व आत्म-विश्वासाशिवाय सद्गुरु विश्वास होत नाही. अवकाश थोडा आहे, संधी नामी आहे. ही संधी गेली तर किती प्रकारच्या सांध्यात चेपलें जाऊन किती दुःख भोगावें लागेल तें सांगतां येणार नाहीं.



ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

३६३, मंगळदास मार्केटसमोर, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४

तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रिटेलर्स

# श्री शंकराचार्यांची कामगिरी

—स्वामी शिवानंद

**श्री शंकराचार्यांची जयंती नुकतीच देशभर साजरी झाली. अद्वैत सिद्धांताचे पुरस्कर्ते व वेदान्त धर्माची पताका फडकविणारे या नात्यानें त्यांचें जीवनकार्य फार महत्वाचें आहे. या लेखांत स्वामी शिवानंद यानीं त्या कामगिरीचें महत्व स्पष्ट केलें आहे.**

आजकाल वैदिक धर्माचें महत्त्व सर्वांना कळून चुकलें आहे व बरोबर त्या धर्माचें आचरण होत आहे. ही किमया कोणी घडवून आणिली माहीत आहे? श्री आदि शंकराचार्य यानीं. आज आमच्या वैदिक धर्माच्या आड कोणी येऊं शकत नाहीं परंतु ज्या काळीं शंकराचार्यांचा अवतार झाला तो काळ मोठा विचित्र होता. त्या काळांत वैदिक धर्मावर चोहोंकडून प्रहार होत होते. तो धर्म जगतो कीं मरतो अशी विपन्नावस्था प्राप्त झाली होती. जोरदार व पल्लेदार हल्ले होऊं लागले होते. असें असतांही एकट्या व एकाकी शंकराचार्यांनी ते तत्कालीन हल्ले परतवून लावले. आणि ही कामगिरी त्यांनीं थोड्या कालावधींत परिणामकारक रीतीनें घडवून आणिली. वैदिक धर्माला व अद्वैत मताला त्यांनीं प्राचीन काळचें वैभवाचे स्थान प्राप्त करून दिलें.

## श्रीशंकराचार्यांचें शस्त्र

हे हल्ले त्यानीं परतविले ते कोणत्या शस्त्रानीं? त्यानी आपल्या हातीं हत्यार कोणतें घेतली? ज्ञानाच्या व अध्यात्माच्या बळावर ही जादू त्यानीं घडवून आणली.

तत्पूर्वीच्या काळांत या देशावर संकटें आलीं होतीं. त्या काळांत राम व कृष्ण यांच्यासारखे अवतार अधर्माचा नाश करून धर्माची स्थापना करण्यासाठीं या भूतलावर अवतार घेऊन आले. त्यांना धर्मस्थापनेसाठीं शारिरिक बळाचा व शस्त्राचा उपयोग करावा लागला कारण ते हल्लेच तशा स्वरुपाचे होते. असुरांना ज्ञानाचें व अध्यात्माचें काय? त्यांच्या बाबतींत शारीरिक बळाचाच उपयोग करणें जरूर होतें.

कलियुगांत धर्मावर जी काळोखी आली, ग्लानी आली ती शारीरिक पेक्षां मानसीक स्वरुपाची व अंतर्गत स्वरुपाची होती.

प्रत्येकाच्या मनांत अधर्माचें वारें खेळूं लागलें होतें जो तो अधर्माचें आचरण पर्यंत करू लागला होता. त्यांच्या मनांत थोरपालट घडवून आणावयाचा होता.

मनावर सुयोग्य संस्कार घडवून आणावयाचे होते. तें कार्य ज्ञानबळानें व मनाच्या शुद्धिकरणानें घडवून आणावयाचें होतें.

त्यासाठीं परिणामकारक हत्यार बनवायचें होतें व तें परिणामकारक रीतीनें उपयोगांत आणावयाचें होतें. त्यासाठीं श्रीशंकराचार्यांना ब्राह्मण कुळांत जन्म घ्यावा लागला, आणि बाळपणीच सन्यास घेऊन आपल्या कार्याला लागावें लागलें.

## कामगिरीचें महत्त्व

त्यापूर्वीच्या राम व कृष्ण या अवतारांकडे पहातां त्यानीं क्षत्रिय कुळांत जन्म घेतला. कारण धर्माची स्थापना करण्यासाठीं त्यांना लष्करी पेशा स्वीकारावयाचा होता.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत व इतिहासांत शंकराचार्यांचें स्थान फार महत्त्वाचें आहे.

श्रीशंकराचार्यांच्या कामगिरीचें महत्त्व कुठवर सांगावें ? आज जो भारतवर्ष आपणास दिसतो आहे त्याचा अवतार कित्येक वर्षांपूर्वीच संपुष्टांत आला असता. परंतु शंकराचार्यांमुळें भारतावरील ती नामशेष होऊन जाण्याची आपत्ती टळली. कारण त्या काळांत त्याच्यावर तसेच प्रबल स्वरुपाचे हल्ले झाले होते. त्या हल्ल्यांतून बचावणें महा कठीण होतें. आणि त्या दृष्टीनें पहातां श्री शंकराचार्यांची कामगिरी फार मोठी तशीच महत्त्वाची आहे. प्रत्येक हिंदूचे मन त्यांनीं भारून टाकिलें.

भारतांत फार थोर व बुद्धिमान् माणसें होऊन गेलीं. त्या बुद्धिमंतांत श्री शंकराचार्यांना अग्रस्थान द्यावें लागेल. अद्वैत तत्त्वज्ञानाचें स्पष्टीकरण त्यांनीं अत्यंत परिणामकारक व बिनतोड रीतीनें केलें. ते व्यावहारीक तत्त्वज्ञानी होते. ज्ञानवंतांत ते पूर्ण ज्ञानी होते. त्यांचें व्यक्तिमत्त्व अत्यंत आकर्षक होतें. तें जे कांहीं सांगत तें अंतःकरणाचा ठाव घेणारें व पूर्णपणें पटणारें असे त्यांना तावडतोब जरुर त्या मुद्याला हात घालून तो पटेल अशा पद्धतीनें स्पष्ट करतां येत असे. ते खरेखुरे जन्मजात योगी व ज्ञानी होते. त्यांची तपश्चर्या दांडगी होती. लोह चुंबकाची आकर्षण शक्ति त्यांच्या ठायीं होती.

## ज्ञानाच्या सर्व शाखांत प्रवेश

ज्ञानाची अशी एकही शाखा नाहीं कीं जिला स्पर्श करुन त्यांत त्यानीं संजीवन आणिलें नाहीं. त्यांचा हात ज्याला ज्याला लागला त्याचें सोनें झालें. अगदीं शंभर नंबरी सोनें. त्यांचा स्पर्शच तसा होता. अल्पावधींत किती तरी मोठी व बहु मोलाची कामगिरी त्यानीं आमच्यासाठीं पार पाडून ठेविली आहे. जोंपर्यंत आकाशांत चंद्रसूर्य बोलानें तळपताहेत, तोंपर्यंत त्यानीं चेतविलेला ज्ञानसूर्याचा प्रकाश हिंदी जनतेला सुखवीत व तिचें मार्गदर्शन करीत राहील.

अत्यंत गहन अशा प्रश्नांचा उकल त्यांनीं किती सहज व सुलभतेनें केला आहे. गच्च मारलेल्या ज्ञानाच्या गांठी त्यांनीं सहजतेनें उलगडल्या. तत्त्वज्ञानाचे कितीतरी प्रश्न गूढतेंत गडप होऊन राहिले होते. त्यांना अंधकारांतून त्यांनीं उजेडांत आणिलें. ही त्यांची हातोटी दुसऱ्या कोणालाहि साधलेली नाहीं. या बाबतींत त्यांच्यासारखे तेच असे साऱ्या जगांतील तत्त्वज्ञांनीं मान्य केलें आहे. ते आदर्श शिक्षक, आदर्श प्रचारक, त्याचप्रमाणें दुसऱ्याच्या अंतःकरणांत प्रवेश करून त्याला आपलीं मतें मान्य करायला लावणारे त्यांच्यासारखे तेच होत.

## जगाच्या इतिहासांत तोड सांपडणार नाहीं

जगांतील कोणत्याहि वाङ्मयाकडे नजर फेका. त्यांनीं अल्पावधींत जे बहुमोली व बहुगुणी वाङ्मय निर्माण केलें त्या तोडीचें तेवढ्या कालावधींत निर्माण करणारा शंकराचार्यांच्या तोडीचा दुसरा कोणीहि दाखवून देतां येणार नाहीं. पाश्चात्य देशांत आजहि जे तत्त्वज्ञ आहेत त्या सर्वांनीं शंकराचार्यांच्या अचाट बुद्धि सामर्थ्याचें कौतुक केलें आहे व आजही करीत आहेत.

धर्म व तत्त्वज्ञान या दृष्टीनें त्यांच्यावर मात करणारा कोणीहि निपजला नाहीं. सारा भारत झंझावाताप्रमाणें त्यांनीं पायाखालीं घातला. कशासाठीं ? सद्धर्म प्रचारासाठीं. निरनिराळ्या मतांचा गलबला माजलेला होता. कोणाचा पायपोस कोणाच्यांत नव्हता. जिकडे तिकडे पडझड, आदळ आपट चालू होती. त्यांनीं सर्व विरोधी मतांचें शास्त्रीय रीतीनें खंडन करून अद्वैत मताचा पगडा सर्वांवर बसविला. जेथें जेथें धर्मपीठ व धार्मिक पुढारी होते तेथें तेथें जाऊन त्यांनीं त्यांना आव्हानपूर्वक चर्चेला पाचारण केलें व त्यांना आपलीं मतें पटवून देऊन तीं मान्य करायला लाविलीं.

## पाखंडवादाचें खंडन

श्री शंकराचार्यांनीं भारतभर प्रवास करून व निरनिराळ्या मतांच्या धर्मश्रेष्ठींना गांठून व त्यांच्याशीं वादविवाद घालून जो जय मिळविला त्याला साऱ्या जगाच्या इतिहासांत कुठेंहि तोड सांपडणार नाहीं.

त्यांनीं प्रत्येक धर्मगुरूला पाचारण केलें. त्याचें म्हणणें ऐकून घेऊन त्याच्या गळीं आपलें अद्वैताचें तत्त्वज्ञान उतरविलें. ते दिग्विजयासाठीं बाहेर पडलेले होते. त्यांना अधार्मिक मतांचें खंडन करून खऱ्या धर्माची पताका फडकवावयाची होती. तेंच तर त्यांचें जीवनकार्य होतें.

भट भास्कर दंडी, मयूर, हर्ष, अभिनवगुप्त, कुमारील, प्रभाकर, मुरारी मिश्र असे एक ना दोन किती तरी धर्मवीर गांठून त्यांनीं वादविवादांत त्यांना पूर्णपणें जिंकिलें व त्यांना आपलें वेदान्त तत्त्वज्ञान मान्य करायला लाविलें.

एकच उदाहरण येथें घेऊन त्यांची वादविवाद पद्धति व आपल्या विरोधकाला जिंकण्याची पद्धति दाखविण्याचा प्रयत्न करूंया.

## मंडणमिश्राशीं सामना

एकदां ते महिष्मति राज्यांत गेले. त्या राजाचा प्रमुख पंडीत होता महाविद्वान मंडणमिश्र. तो कर्ममिमांसक होता. सन्यासधर्मांचा द्वेष्टा होता. तो चेष्टा करायचा सन्यास धर्मांची! श्रीशंकराचार्य त्याच्याकडे गेलें तेव्हां ते एका श्राद्ध-समारंभात गुंतलें होते. बरोबर ब्राह्मण सेना होती त्या गर्दीत शंकराचार्य एकाएकी प्रवेश करते झाले. त्यांना पाहून ( सन्यासी वेषांत ) मंडणमिश्र चिडले! अद्वातद्वा बोलूं लागले! परंतु इतरांनीं त्यांना थोपविलें. ते थंडावले.

त्यानंतर श्रीशंकराचार्यांनीं त्यांना धर्म चर्चेचें आव्हान दिलें. 'चला! आपण धर्मावर वादविवाद करू व कोण कोणाला हटवितो तें पाहूं. तुमचा कर्मवाद व आमचा संन्यासवाद. मंडणमिश्राची पत्नी भारती मोठी विदुषी व तत्त्वज्ञानी होती. तिनें वादविवादाचें नियंत्रण करावें व शेवटचें काय असेल तें मत द्यावें असें ठरून तें दोघांनींही मान्य केलें.

## कोणी काय करानें?

त्यावेळीं असें ठरलें कीं, शंकराचार्य जर वादांत हरले तर त्यांनीं लग्नकार्य करून एक संसारी या नात्यानें मंडणमिश्राबरोबर रहावयाचें याच्या उलट मंडणमिश्र वादांत हरले तर त्यानीं संसारावर पाणी सोडून सन्यास दीक्षा घ्यावयाची व शंकराचार्यांच्या मार्गानें जावयाचें!

झालें. वादविवाद जोरजोरांत सुरु झाला. तो दिवसांचे दिवस चालला होता. उत्तरोत्तर त्याला कडाक्याचें स्वरूप येऊं लागले होते. भारती मोठी हुषार, धोरणी व कर्तव्य परायण होती. तिनें काय केलें? त्यांचा वादविवादाचा काथ्याकुट ऐकायला ती बसलीच नाहीं; तिला तिची घरची कामें करायचीं होतीं. तिनें दोन पुष्पहार आणिले व ते दोन्हीं वादविवादपटूंच्या गळ्यांत घातले आणि असें सांगितलें कीं, ज्याच्या गळ्यांतील हार प्रथम सुकायला लागेल त्यानें आपला पराभव पत्करुन योग्य तो मार्ग ठरल्याप्रमाणें स्वीकारावयाचा.

वादविवाद रंगत चालला होता. त्यांत चढउतार चालू होता. अशारीतीनें हा वादविवाद सतत सतरा दिवस चालला. सतराव्या दिवशीं मंडणमिश्राच्या गळ्यांतील पुष्पहार कोमेजूं लागला. त्यानें आपलें भवितव्य ओळखलें. त्यानें पराभव मान्य केला व संन्यास धर्माची दीक्षा घेऊन तो शंकराचार्यांचा अनुयायी—शिष्य बनला!

# प्रयत्न हाच परमेश्वर

## संत तिरुवल्लुवार

मी यश मिळविणारच या निर्धारानें बाहेर पडा. तो निर्धार केल्यामुळें तुम्ही सतत उद्योगाची कांस धराल आणि ही बहुमोल देणगी ज्याच्या वाट्यास आली आहे त्याला यशाबद्दल धास्ती बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं. मग त्याच्यापुढें कितीही बिकट प्रश्न खडा असूं द्या. त्यांत तो यश मिळविल्याशिवाय रहाणार नाहीं. निर्धार हें त्याचें सामर्थ्य आहे.

त्याचें सारें लक्ष हातांतील कार्याकडे व त्यांत संपूर्ण यश मिळविण्याकडे असतें. त्याला आणखी दुसरें तिसरें कांहीं दिसत नाहीं कार्याची प्रचंडता त्याला घाबरवूं शकत नाहीं. कार्य करतां करतां तें मुदतींत नाहीं पार पडलें तरी तो बिचकून जाणार नाहीं. त्याच्या पाठीशीं यश मिळविण्याचा निर्धार खडा असतो. तो जागता पहारा करीत असतो. तो उरलेलाहि भागहि त्याच हिंमतीनें पार पाडतो. याचा अर्थ एवढाच कीं, एकदां निर्धारपूर्वक एखाद्या कार्याच्या मागें लागल्यानंतर ती कार्यतत्परता सतत जोरदारपणें तशीच चालू ठेवण्याचें सामर्थ्य त्याला आपोआप प्राप्त झालेलें असतें. विजयाकडून विजयाकडे तो सतत धांव घेत चाललेला असतो.

मी करीत आहें हें स्वार्थासाठीं नसून इतर अनेकांसाठीं आहे, त्यांत अनेकांचें सुख सामावलेलें आहे हा विचार ज्याच्या मनांत जागा असतो तो यशस्वी कारागीर समाजाचा एक आधारस्तंभ होऊन रहात असतो.

समाजाचें कल्याण व्हावें यासाठीं धडपड करणें हा एक सद्गुण आहे. तो आमच्यापैकीं प्रत्येकानें अंगीं बाणविण्यासाठीं अहर्निश झटलें पाहिजे.

---

### संन्यास दीक्षा घेतली

केवढा आहे हा विद्वत्तेचा व वेदान्त तत्त्वज्ञानाचा प्रभाव ! मंडणमिश्राची मालमत्ता पुष्कळ होती. तिच्यावर तुळसीपत्र ठेऊन ती त्यानें श्री शंकराचार्यांना आनंदानें अर्पण केली. शंकराचार्यांनीं ती गोरगरिबांस वाटून टाकिली.

श्री शंकराचार्यांनीं अशा रीतीनें वेदान्त धर्माची पताका सर्वत्र फडकविली व ती आजतागायत मोठ्या डौलानें फडकत आहे व पुढेंही ती तशीच डौलानें यावच्चंद्र दिवाकरौ फडकत राहील हें निश्चित होय.

सतत प्रयत्न सततोद्योग करीत राहिल्यानें कोणती गोष्ट साध्य होऊं शकणार नाहीं ? वैभवश्री संपादन करण्याचें तें प्रमुख साधन आहे; आणि आळस ? हें जाणून बुजून दारिद्र्य संपादन करण्याचें साधन आहे जो उद्योगाची कांस धरतो त्याच्यावर लक्ष्मीचा वरदहस्त सतत असतो आणि आळशावर भिक्षा मागण्याची दुसऱ्याकडे तोंड वेंगाडण्याची पाळी येत असते. त्या आकाबाईला तुम्हीं जवळ करणार आहांत का ?

आपणाला कोणत्या परिस्थितींत वावरायाचें आहे, त्यासाठीं कोणत्या मार्गांचें अवलंबन करण्यांत आले पाहिजे हें जाणून घेऊन सुविचारी माणूस सतत प्रयत्नांची कांस धरतो व न डगमगतां किंवा निराश न होतां उद्योगाचे घण हाणीत रहातो. कुठपर्यंत ! संपूर्ण यश मिळेपर्यंत.


जो सतत प्रयत्नशील असतो त्याला अधीर होण्याची आवश्यकता मुळींच नाहीं. आज नाहीं उद्यां यश हें त्याला मिळावयाचेंच. त्याबद्दल त्यानें चिंता करण्याचें मुळींच कारण नाहीं. प्रयत्न हाच त्याचा परमेश्वर झालेला असतो आणि आज ना उद्यां तो त्याला पावणारच हें ब्रह्मलिखित आहे.

---


## जनतेचे आरोग्य म्हणजेच राष्ट्राचे सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान बनविण्यासाठीं बलवान बनाः**—यासाठीं लागणारी हरेक तऱ्हेची उपकरणें म्हणजे डंबल्स्, लेझीम, मुगदुल, यासारखा सर्वश्रेष्ठ व उत्तम तऱ्हेचा माल बनविण्यांत येतो.

आम्ही कांदिवली टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयूट, डि. स्कूल बोर्डे, जिल्हा परिषद, नगरपालिका, ग्रामपंचायती, व्यायामशाळा, विकास केंद्रें, याना माल पुरवितो. अधिक माहिती आणि कॅटलॉगसाठीं लिहाः...



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स**
८५ बापू खोटे स्ट्रीट,
जांमळी मोहोल्ला, मुंबई ३

# ‘ श्रीसाईबाबा आणि मी एकरूप आहोंत ’

**श्री वामनशास्त्री इस्लामपूरकर हे ह. भ. प. श्रीदासगणू महाराज यांचे गुरू होत. या उभयतांची भेट कुठें व कशी झाली, शास्त्रीबुवांनीं त्यांना झिडकारिलें असतांहि ते त्यांना कसे चिकटले, पुढें शास्त्रीबुवांनीं त्यांच्यावर अनुग्रह व कृपेचा वर्षाव करून शेवटीं “ श्रीसाईबाबा ही योग्य विभूति आहे, ते व मी भिन्न नाहीं. तेच यापुढें वेळोवेळीं मार्गदर्शन करतील ” असा आशीर्वाद त्यांना दिला. ती सर्व हकिगत यापुढें ‘ संतकवि दासगणू महाराज ’ यांच्या चरित्रावरून देण्यांत आली आहे. ’**

आपल्या नोकरीचा आरंभ श्रीदासगणूंनीं श्रीगोंदास केला, हें मागें उल्लेखिलेलें आहेच. तेथेंच असतांना श्रीसद्गुरु वामनशास्त्री इस्लामपूरकर यांची भेट झाली. श्रीवामनशास्त्री यांची फारच थोडी माहिती उपलब्ध होते. ( श्री. लो. टिळकांच्या बरोबर ज्या श्री. वामनशास्त्री इस्लामपूरकरांचा उल्लेख येतो, ते हे नव्हेत. ) हे मोंगलाईतील परांडे या गांवाजवळ असलेल्या काजीच्या इस्लामपूरचे राहणारे श्रीकल्याण महाराजांच्या परंपरेंतील सांप्रदायिक रामदासी. श्रीवामनशास्त्र्यांचे वडील लहानपणींच वारल्यानें त्यांच्या मामानें आपल्या या पोरक्या भाचाला आपलेकडे हैदराबादेस नेलें. श्रीवामनशास्त्री यांचें पदवीपर्यंतचें शिक्षण तेथेंच मामाकडे झालें. हें पुढें मद्रासकडे मोठे सरकारी अधिकारी झाले होते. यांचा संस्कृत विद्येचा व्यासंग फार दांडगा असे. कांहीं कारणानें प्राचीन संस्कृत ग्रंथ पाहण्याचे प्रसंग आल्यास तें काम श्रीवामनशास्त्री यांजकडे सोंपविलें जाई. यांच्यापासूनच श्रीदासगणूंनीं मंत्रोपदेश घेतला. तो प्रसंग असा. श्रीगोंदास आबाशास्त्री भणगे या वृद्ध विद्वानाचें येथें कांहीं पुरातन संस्कृत ग्रंथ आहेत, अशी माहिती लागल्यावरून श्रीवामनशास्त्री या ग्रंथांच्या संशोधनासाठीं श्रीगोंदास आले होते. ते सरकारी अधिकारी असल्यानें त्यांची व्यवस्था सरकारकडून करण्यांत आली होती. श्रीदासगणूंना या कामीं वरिष्ठांकडून सूचना आली कीं, शास्त्रीबुवांच्या तैनातीस राहून त्यांना कोणतीहि अडचण पडणार नाहीं, असे करावें.

कचेरींतून परत येत असतांना आबाशास्त्री भणगे यांच्या दारावरूनच रस्ता होता. शास्त्रीबुवा विड्यांचें साहित्य पुढें घेऊन पान कुटीत बसले होते. त्यांनीं ‘ ये गणपतराव ’ असें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. बैठकीवर जरा नीट बसल्यासारखें करून दासगणू म्हणाले, शास्त्रीबुवा, तुमच्या येथें कांहीं जुन्या पोथ्या आहेत ना ! त्या पाहण्यासाठीं एक शास्त्री सरकारनें मुद्दाम पाठविला आहे. जुनें वाङ्मय फार

मूल्यवान् मानलें जातें. त्याची कोणीं किती आबाळ केली, तें पाहून सरकार त्याचा जाब विचारणार आहे.' तें ऐकतांच भावडे भणगेशास्त्री गडबडले. त्यांना तें सर्व अक्षरशः खरें वाटलें. सरकार हें प्रकरण त्या काळीं अत्यंत भीतिदायक होतें. आज आपल्याला त्याची कल्पनाच करतां येणार नाहीं. शास्त्रीबुवा घाबरून म्हणाले, "आतां रे गणपतराव! मी अलीकडे फार थकलों बघ. गेल्या कित्येक वर्षांत मीं त्या पोथ्यांकडे नुसतें पाहिलें सुद्धां नाहीं. कांहीं भानगड आणूं नको बाबा!"

"भानगड कशाची शास्त्रीबुवा? ग्रंथ नीट झाडून झटकून ठेवा. पोथ्या चांगल्या व्यवस्थित आहेत, असें पाहिल्यावर सरकार झालें तरी काय करणार? मी माणूस पाठवून देतों त्याचेकडून नीट स्वच्छता करून घ्या, म्हणजे झालें."

'ठीक आहे' असें म्हणुन आबाशास्त्री कामास लागले आणि वर्षानुवर्ष धूळ खात पडलेल्या पोथ्यांची प्रक्षाळपुजा झाली. या प्रत्यक्ष अनुभवलेल्या प्रसंगाचा उपयोग श्रीदासगणूंनीं पुढें 'भक्तिसारामृत' या ग्रंथांतील ३३ व्या अध्यायांत एका प्रकरणीं करून घेतला असावा. जुन्या वाङ्मयाची किती आबाळ होते, ऐहिक लाभ कांहीं नसल्यानें किती उपेक्षाबुद्धीनें त्याकडे पाहिलें जातें; याचें मोठें सुरेख वर्णन तेथें आलेलें आहे.

ठरलेल्या दिवशीं वामनशास्त्री येऊं शकले नाहींत. त्यांना दोन दिवस उशीर झाला. समागमें असलेला आचारी मागें राहिल्यामुळें वामनशास्त्री हे एका ब्राह्मण बाईनें चालविलेल्या घरगुती खाणावळींत जेवणास आले होते. श्रीदासगणूहि याच खाणावळींत जेवत असत. त्यांनीं शास्त्रीबुवांना अजून पाहिलें नव्हतें. नेहमींच्या थट्टेखोर स्वभावास अनुसरून श्रीदासगणू तेथील एकास म्हणाले, 'सरकारनें कोण पंडित पाठविला आहे कोणास ठाऊक! दोन दिवस झाले. स्वारीचा पत्ता नाहीं. इतक्या लांब स्टेशनवर फुकट हेलपाटे झाले. विद्वत्ता कोणीं विचारावी? पण सरकारी शास्त्री म्हणून डौल मात्र पाहून घ्यावा लागेल. जुन्या ग्रंथांच्या रद्दींतून हे विद्वान् काय रत्नें काढणार आहेत, तें ईश्वर जाणे!'

हें सर्व भाषण समोरच बसलेले श्रीवामनशास्त्री ऐकत होते. ते कांहींहि बोलले नाहींत किंवा त्यांच्या चेहऱ्यावर कुठलाहि भाव तिरस्काराचा व औत्सुक्याचाहि दिसला नाहीं. नेहमीं कोणी ना कोणी तरी प्रवासी जेवणास येतात. त्यांतीलच हे एक अशी श्रीदासगणूची भावना. पुढें कचेरींत ज्या वेळीं ओळख करून घेण्याचा प्रसंग आला, तेव्हां हेच वामनशास्त्री असें समजल्यावर दासगणूंना फार कानकोंडे वाटलें. शास्त्रीबुवांनीं या प्रकरणाची थोडीहि जाणीव कोणत्याहि प्रकारांनीं दिली नाहीं. त्यामुळें तर अधिकच लाजल्यासारखें झालें. शास्त्रीबुवांचे सर्व व्यवहार अगदीं शांतपणानें आणि विशेष कांहीं झालेंच नाहीं, या भावनेनें चालले होते.

एक दिवस रात्रीं श्रीवामनशास्त्र्यांच्या खोलींत दासगणूंनीं सहज डोकावलें. शास्त्रीबुवा शुचिर्भूत होऊन नित्यनियमाप्रमाणें पूजेस बसले होते. पूजा फारच तल्लीनतेनें

चालली होती. नंतर श्रीमद्‍भागवताचें पारायण करीत असतांना, भक्तिरसाच्या उद्रेकानें त्यांच्या दोन्ही नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा ओघळत होत्या. मुद्रेवर एक तऱ्हेचें अलौकिक तेज चमकत होतें. या दृश्याचा श्रीदासगणूंच्या मनावर फार परिणाम झाला. श्रीवामनशास्त्र्यांच्या सहवासांत असतांना, त्यांचें सदाचरण, प्रशांत वृत्ति, सरळ स्वभाव यांचा अनुभव आल्यानें त्यांच्याविषयींची आदराची भावना यापूर्वीच दासगणूंच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली होती, पण भावसमाधींत रंगून गेलेली शास्त्रीबुवांची ती दिव्यमूर्ति अवलोकून साध्या आदराला भक्तीचें स्वरूप प्राप्त झालें. परमार्थाला अवश्य असलेला गुरूपदेश घ्यावयाचा, तो याच सत्पुरुषांकडून असा त्यांचा निश्चय झाला.

श्रीगोंद्याचें काम संपत आलें होतें. आतां लवकरच परत जावयाचें असें ठरल्यानें शास्त्रीबुवांनीं दासगणूंना बोलावून प्रेमानें म्हटलें, 'गणपतराव, तुम्हीं फार साह्य केलेंत, याकरितां पारितोषिक म्हणून म्हणा वा तुमच्या माझ्या भेटीची आठवण म्हणून तुम्हांस काय देऊं ? माझ्या मनांत ही अंगठी तुम्हांस द्यावयाची आहे.'

श्रीदासगणूंनीं पुढें होऊन पायांवर डोकें ठेविलें आणि हात जोडून गहिंवरलेल्या स्वरानें ते म्हणाले, 'मीं आपला फार अपराध केला असतांनाहि आपण माझ्यावर थोडाहि रोष दाखविला नाहींत. याहून दुसरें पारितोषिक काय पाहिजे ? मला आतां पदरांत घ्या आणि उपदेश देऊन कृतार्थ करा.'

शास्त्रीबुवांनीं त्यांना झिडकारून टाकण्याचा नाना रीतीनें प्रयत्न केला, पण 'आपण मला आपले म्हटल्यावांचून मी हे पाय सोडणार नाहीं;' असा हट्टच दासगणूंनीं धरला. त्यांचे डोळेहि अश्रूंनीं भरून आले. हा निग्रहाचा भाव पाहून श्रीवामनशास्त्री प्रसन्न झाले. त्यांनीं दासगणूंना यथाविधि मंत्रोपदेश करण्याचें मान्य केलें. गुरुदक्षिणा म्हणून एक महिन्याचा पगार उपदेश घेतांना पुढें ठेवावा, अशी मनीषा होती; पण श्रीवामनशास्त्री यांनीं दासगणूंना मग घरीं जाऊं दिलें. नाहीं 'अरे, एका पगारानें काय होतें ? गुरुला सर्वस्व अर्पण करावें लागते. तशी तयारी आहे का ? जाऊं दे. तुझ्या सर्व नोकरीचीच मी गुरुदक्षिणा घेणार आहे, पण त्याला अवकाश आहे. कडोसरीला दोन पैसे आहेत ना ? तेवढे सध्यां पुरेत ' असें ते म्हणाले.

श्रीदासगणू हे प्रथम कट्टर शिवभक्त. सोमवार, प्रदोष, शिवरात्र हीं व्रतें ते मोठ्या निष्ठेनें व कडक रीतीनें पाळीत. महाशिवरात्रीचा सर्व दिवस तोंडांत कांहीहि न घालतां शिवलिंगावर रुद्राचा अभिषेक करीत जागून काढीत. विष्णुदेवतेविषयीं त्यांना लवमात्र आदर नव्हता. उलट तिटकाराच असे. त्यांनीं गुरुमंत्र घेतला, तो सुद्धा बेलाचे पानावर. श्रीसद्‍गुरु वामनशास्त्री हे रामदाससांप्रदायी असूनहि पंढरपूरचे वारकरी होते. त्यांनीं अनुग्रह करतेवेळीं बेलाच्या पानांविषयींचा आपल्या शिष्याचा हट्ट पुरविला व उपदेशहि शिवमंत्राचाच केला, परंतु आज्ञा म्हणून पंढरपूरची वारी करावयास सांगितली. सद्‍गुरुचा उपदेश झाल्यानंतरच श्रीदासगणू हे 'दासगणू' या नांवानें प्रसिद्धीस आले.

सद्गुरुंचा दास असा गणू हा सद्गुरुंचा दास या भावनेनें ते काव्यामध्यें स्वतःचा उल्लेख दासगणू अथवा गणूदास असा दोन्ही रीतीनें करूं लागले. पुढें रामदास या नांवाप्रमाणें तेंच त्यांचें नांव प्रख्यातीस आलें. आपल्या नोकरींत असतांना केलेल्या काव्यांतून—

" गणूदास रची हे कवनकथा सुन्दर ।
वामनशास्त्रींचा हस्त मस्तकावर ॥ "

अशा अर्थाचें अनेक उल्लेख त्यांनी केले आहेत.

पंढरपूरच्या वारीची आज्ञा दासगणूंना फारशी रुचली नाहीं. परंतु " आज्ञा गुरूणां ह्यविचारणीया " या नियमानें मनापासून इच्छा नसतांनाहि गुरूंची ही आज्ञा दासगणूंनीं निग्रहानें पाळली. नोकरींत असल्यामुळें ठराविक वेळींच जातां येत नसे. वर्षातून कोणत्या तरी शुक्लपक्षांतील एकादशीस रजा मिळेल, त्याप्रमाणें ते वारीस जाऊन येत. नोकरींत असतांना व नंतरहि या नियमास अद्यापपावेतों कधीं खंड पडलेला नाहीं.

एकदां मात्र फार चमत्कारीक प्रसंग निर्माण झाला. वर्ष संपत आलें तरी पंढरपुरास वारीला जातां आलें नव्हतें. या येत्या एकादशीस गेलेंच पाहिजे, नाहींतर नियम मोडतो म्हणून फौजदाराजवळ रजा मिळावी, अशी विनंती केली. फिलीप नांवाचा एक ख्रिश्चन त्यांचा फौजदार होता. तो म्हणाला, 'मला माहीत आहे. पंढरपुरास जाण्यासाठीं तुला रजा हवी आहे. मी रजा देणार नाहीं. अरे! दगडाधोंड्यांत का देव असतो ? '

" मी कोठें जाणार याला काय महत्त्व आहे ? माझी रजा शिल्लक आहे. सध्यां महत्त्वाचें तसें कामहि कचेरींत नाहीं आणि मला रजा हवी आहे. लाकडाच्या फळकुटांत देव असतो का ? असें मीं विचारलें तर मात्र आपण रागवाल ! "

" बरं ! बरं ! फार बोलूं नको. देणार नाहीं तुला रजा. "

" मला गेलेच पाहिजे. आपण रजा देत नसाल तर मी तसाच जाईन. "

" तसाच गेलास तर तुझ्यावर खटला भरीन. तूं पोलिसांत आहेस. शिक्षा भोगावी लागेल. चेष्टा नाहींत या ! "

" आपल्या इच्छेस येईल तसें करा. माझे दैव असेल तसें होईल. "

शेवटीं रजा मिळाल्यावाचूनच श्रीदासगणू पंढरपुरास वारीकरितां निघून गेले. इकडे फौजदारांनी ' हवालदार रजा न घेतां काम सोडून निघून गेला. तरी पुढें काय करावयाचें त्याची आज्ञा व्हावी. ' असें वरिष्ठांस विचारलें. ' हवालदाराचा जबाब घेऊन लेखी पाठवावा. ' असें वरून सांगण्यांत आलें.

श्रीदासगणूंच्या मनांत आतां काय होतें, ही धागधुग होतीच. ते चंद्रभागेचें स्नान करून प्रदक्षिणेस जावयास निघाले असतां, शिंकीपाडळीचा पाटील हांका मारीत धांवत येतांना दिसला. 'गणपतराव, अगदीं देव भेटलांत. माझे दोन बैल चार दिवसांपूर्वी चोरीस गेले आहेत. त्यांतील एक आतां येथें पंढरपुरांत आहे. शोध केला तर दुसराहि सांपडेल. चला ना तिथंवर' असें तो म्हणाला. हें ऐकून दासगणूंना वाटणारी काळजी

पार दूर झाली. त्यावेळीं पंढरपुरास श्री. बळवंतराव यादगिरे हे फौजदार होते. या दोघांचा स्नेहही चांगला होता. त्यांच्या मदतीनें दोन्ही बैल पकडले आणि चार दिवस निर्धास्तपणें पंढरपुरास राहिले. नंतर मुद्देमाल, फिर्यादी आणि पंढरपूरच्या फौजदाराचें अधिकृत पत्र यांसह श्रीदासगणूंची स्वारी जामखेडास परत आली.

आपल्याविरुद्ध वर तक्रार झाली आहे, हें त्यांना माहीत होतेंच. त्यांनी योग्य ती काळजी घेऊन सावधपणानें सर्व वृत्त वरिष्ठांकडे लेखी पाठविलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, श्रीदासगणूंना कर्तव्यदक्षतेकरितां शाबासकी मिळाली आणि नीट चौकशी न करतां तक्रार करण्याचा खोडसाळपणा केला, म्हणून फौजदारास समज देण्यांत आली. या झालेल्या घटनेकडे आपापल्या भावनेनुसार कोणी चमत्कार म्हणून वा कोणी केवळ योगायोग म्हणून पाहील; परंतु या प्रसंगाचें कांहीं वैशिष्ट्य आहे, हें निश्चित. यानंतर पुढें केव्हांहि पंढरपूरच्या वारीसंबंधीं कोणतीहि अडचण उपस्थित झाली नाहीं.

पंढरपूरच्या वारीमुळें दासगणूंच्या अंत:करणवृत्तींत इष्ट तो पालट हळू हळू आपोआप घडून येऊं लागला. आरंभीं आरंभीं केवळ सद्गुरूंची आज्ञा म्हणून ते निरुपायानें पंढरीस जात. त्यांनाच पुढें पांडुरंगाच्या दर्शनाची ओढ लागूं लागली. सासुरवासी मुलीनें माहेरीं यावें, तसा जीवींचा विसांवा त्यांना श्रीक्षेत्र पंढरपुरांत लाभूं लागला. कटिवर कर ठेवून विटेवर उभे राहिलेल्या या सुंदर ध्यानाच्या चरणारविंदीं मनोवृत्ति रंगून गेल्या, त्या नित्याच्याच. श्रीदासगणूंनीं आपल्या या स्थित्यंतराचें वर्णन 'भक्तिसारामृत' ग्रंथांत स्वत:च केलें आहे.

> " तुझ्या कृपेनें अद्वेष्टी । भक्ति उपजली जगजेठी
> होती मला आवडी मोठी । श्रीशंकराची प्रथमत: ।
> तैं विष्णुस्वरूपाचा । द्वेष मनीं होता साचा ।
> त्या एकदेशी भक्तीचा । नाश झाला तुझ्या कृपें ।
> आतां हरिहरांत । भेद, न मशीं वाटत ।
> तुम्ही दोघे एकरूप सत्य । ऐसा सिद्धांत जाहला । "

या तऱ्हेचे अनेक उल्लेख त्यांच्या सर्व काव्यभर सांपडतात. कट्टर शिवभक्त श्रीविठ्ठलाचा उपासक झाल्यामुळेंच नरहरी सोनार चरित्र इतकें सरस आणि रसाळ उतरलें. याचें कारण त्या परिस्थितींतून कवि स्वत:च गेले, हें होय.

श्रीवामनशास्त्री इस्लामपूरकर आणि दासगणू या गुरुशिष्यांची भेट मंत्रग्रहणानंतर दोनतीनदांच काय ती झाली. शास्त्रीबोवा पुढें फार दिवस राहिले नाहींत. एकदां ते आपल्या या प्रियशिष्यास घेऊन पंढरीस गेले होते. तेथेंच त्यांनीं मी

काशीस जाऊन देह ठेवणार आहे, हें श्रीदासगणूंजवळ बोलून ठेविलें होतें. पुढें ते त्यावेळीं काशीस जाण्यासाठीं निघाले, त्यावेळीं दौंड येथें मला येऊन भेट, अशी त्यांनीं आपल्या शिष्यास आज्ञा केली. त्याप्रमाणें दासगणू दौंडास सद्गुरूंच्या दर्शनास गेले. गुरुमाउलीची ही शेवटची भेट या कल्पनेनें त्यांचें हृदय दुःखानें भरून आलें होतें. डोळ्यांत अश्रु मावत नव्हते. शास्त्रीबुवांनीं दासगणूंना दौंडावरून परत जाऊं दिलें नाहीं. भुसावळपर्यंत आपल्यासवेंच नेलें. तिकिटाची व्यवस्था आधींच केली होती. आगगाडीच्या दुसऱ्या वर्गाच्या डब्यांतून प्रवास करीत असतांना या गुरुशिष्यांचें जें कांहीं गहनगूढ अंतरीचें असें वत्सल संभाषण झालें, त्याची कल्पना इतरांना कशी करतां येणार ? भुसावळ जवळ येत असलेलें पाहून श्रीसद्गुरु वामनशास्त्री यांनीं आपल्या प्रियशिष्याला हृदयाशीं धरून कुरवाळलें आणि जें सांगावयाचें होतें, तें सर्व सांगितलें. श्रीसद्गुरूंच्या प्रेमाश्रुसिंचनानें श्रीदासगणूंचें मस्तक पावन झालें. जणूं या आसवांच्या मिषानें श्रीसद्गुरुमहाराजांनीं आपलें सर्वस्व दासगणूंच्या ठिकाणीं ओतलें. म्हणूनच संस्कृत भाषेचा वा वेदान्त शास्त्राचा अभ्यास झाला नसतांनाहि शांडिल्यांच्या अर्थगूढ भक्तिसूत्राचा मार्मिक भावार्थ श्रीदासगणू महाराज आपल्या बोधिनी टीकेंतून उत्तम रीतीनें विशद करूं शकले. याचें मूळ जर कुणी श्रीवामनशास्त्री यांच्या नयनांतून झालेल्या प्रेमाभिषेकांत शोधलें तर तो अगदींच चुकला, असें म्हणतां यावयाचें नाहीं. भुसावळहून पुढें जातांना श्रीशास्त्रीबुवांनीं दासगणूंना आग्रहानें परत पाठविलें आणि सांत्वन करीत सांगितलें, "वेड्यासारखें दुःख करूं नकोस. हा मुळीं मृत्युलोकच आहे. त्यांतूनहि मी नित्याचाच दुरावला आहे, अशी समजूत करून घेण्याचें कारण नाहीं. दोनतीनदां शिरडीस गेला होतास ना ? श्रीसाईबाबा योग्य विभूति आहेत. त्यांना माझेंच स्वरूप मान. आम्ही दोघे एकरूप आहोंत. तेच येथून पुढें तुला वेळोवेळीं मार्ग दाखवितील."

---


## साइभक्तांस अमूल्य संधी

साईलीला मासिकाचे सन १९५८ (त्रैमासिक) ते एप्रिल १९५९, ६०, ६१ व ६२ (मासिक) मार्चपर्यंतचें कांहीं अंक शिल्लक असून ते विक्रीस काढले आहेत, फुटकळ अंकास (विशेष अंकांसह) प्रत्येकीं ४ आणे. पोस्टेज निराळे. एक अंकासाठीं पोस्टेज ८ नये पैसे व चार अंकास २० नये पैसे पाठवावे.

---

**उवा घालविण्यासाठीं खात्रीलायक ठरलेलें 'लायसॉफ तेल' वापरा.**

**गिरगांव : बापट ब्रदर्स — दादर : वसंत फॉर्मसी**

# भारताचा अध्यात्माचा वारसा

—स्वामी विवेकानंद

आमचा भारत नामशेष होणार आहे काय ? मग जगांतून सारा अध्यात्मवाद नाहींसा होईल. उच्च स्थानावर आरूढ झालेली सारी नैतिक पातळी नाहींशी होईल. धर्मासंबंधींची आस्था नाहींशी होईल. उच्च ध्येयवादाची इतिश्री होईल. आणि त्याजागीं सुखोपभोग लालसेची स्थापना होईल. पैसा मिळविणें व पैसा उधळणें हेंच तेवढें कार्य शिल्लक राहील. लबाडी, जुलूम जबरदस्ती एकमेकांत चढाओढ यांचें राज्य सुरू होईल. त्यापायीं मनुष्यमात्राला आपल्या आत्म्याचें बलिदान द्यावें लागेल; परंतु असा प्रकार कधीं घडणार नाहीं.

भारताची उच्चासनावर स्थापना व्हायची आहे. कशाच्या सहाय्यानें ? शारीरिक बळाच्या नव्हे तर आत्मीक बळाच्या सहाय्यानें. विनाशाचें निशाण फडकवून नव्हे तर प्रेमाचें व शांततेचें निशाण फडकवून संन्याशाच्या भगव्या वस्त्रांनीं त्याला शोभा येणार आहे. संपत्तीच्या सामर्थ्यानें नव्हे तर भिक्षापात्राच्या सहाय्यानें. मी काय ? मी निःसत्व निर्बल प्राणी ! असें म्हणू नका. तुमच्या ठायीं वास करणारा आत्मा सर्वव्यापी व सर्व शक्तिवान् आहे हें विसरूं नका.

माझ्या तरुण मित्रांनो ! तुमचा देश तुम्हांला हांक मारीत आहे. तुमची जरूरी आहे त्याला. साऱ्या जगाला तुमची जरूरी आहे. तुमचें आत्मीक बळ खडबडून जागें होऊं द्या. त्याच्या सहाय्यानें तुम्हीं भूक, तहान, ऊन, वारा व थंडी वगैरे सर्व कांहीं सहन करूं शकाल. सुखासीन बंगल्यांत गाद्यागिर्द्यांवर लोळत बसत जिवाला जरासुद्धां आंच लागूं न देतां थोडेसें धर्मकार्य इतर देशांतील लोकांना खुशाल करूं द्या. परंतु भारतवासीयांचें तसें नाहीं. धर्मकार्य हें त्यांचें प्रधान कार्य आहे. तें त्यानीं बसतां उठतां सर्व काळ मनोभावें करावयाचें आहे. तुम्हीं स्वतःला क्षुद्र समजूं नका. तुम्ही मोठे आहांत व त्या नात्यानें वागा. त्यागाची नेहमी तयारी ठेवा. त्यागाशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होत नाहीं. पर पुरुषानें असामान्य त्याग करून या जगाची निर्मिती केली मग तुम्हींही तुमच्या परीनें वांट्यास येईल त्या त्यागास सतत तयार राहिलें पाहिजे. तुम्हीं कांहीं करा. त्याचें मोजमाप त्यागाच्या कसोटीवर केलें जाईल. त्याग ही त्याची कसोटी. देहत्याग करण्याची, प्राणार्पण करण्याची पाळी आली तरी त्यासाठींही तुम्हीं तयार असलें पाहिजे.

प्रथम आपण देव बनूं या व इतरांस त्या मार्गानें जाण्यासाठीं—देव बनण्यासाठीं सहाय्य करूं या. स्वतः बनावयाचे व इतरांस त्याप्रमाणें बनण्याच्या बाबतींत सहाय्य करावयाचें. आपण सर्वांनीं हेंच ध्येय निरंतर दृष्टीसमोर ठेवायचें आहे.

---

# रामनामांत साहित्याचें सारसर्वस्व

—संत विनोबा

एखाद्या मनुष्याच्या घरांत बऱ्याचशा बाटल्या भरलेल्या असल्या तर तो मनुष्य बहुधा रोगी असावा असें आपण अनुमान करतों. पण एखाद्याच्या घरांत पुष्कळ पुस्तकें पडलेली दिसली तर आपण त्याला शहाणा समजतों. हा अन्याय नव्हे काय? नाईलाज झाल्याशिवाय बाटली न वापरणें हें आरोग्याचें पहिलें कलम आहे. तसेंच होतां होईल तो बुकांत डोकें म्हणा, डोक्यांत बुक म्हणा, न घालणें हें शहाणपणाचें पहिलें कलम आहे. बाटली ही रोगट शरिराची निदर्शक असते असें आपण मानतों. चोपडीं देखील—मग ती संसार—चोपडीं असो, नाहीं तर परमार्थ चोपडी असो—रोगट मनाची निदर्शक समजली पाहिजे.

अनेक शतकें झालीं, ज्यांच्या शहाणपणाचा सुगंध अजून दुनियेंत दरवळून राहिला आहे त्या लोकांचें लक्ष जीवन साक्षर करण्यापेक्षां सार्थक करण्याकडेच होतें. साक्षर जीवन निरर्थक असू शकतें ह्याचीं उदाहरणें आजच्या सुशिक्षित समाजांत न शोधतां सांपडणारीं आहेत. उलटपक्षीं निरक्षर जीवनहि अत्यंत सार्थक असू शकतें अशा विषयींचे अनेक दाखले इतिहासानें पाहिले आहेत. पुष्कळ वेळां 'सु'–शिक्षित आणि 'अ'–शिक्षित ह्यांच्या जीवनांची तुलना करतां '**अक्षराणामकारोऽस्मि**' ह्या गीताप्रवचनांत सांगितल्याप्रमाणें 'सु' पेक्षां 'अ' च पसंत करावासा वाटतो.

**खऱ्या ज्ञानाची चव केव्हां कळेल ?**

पुस्तकांत अक्षरें असतात. त्यामुळें पुस्तकांच्या संगतीनें जीवन सार्थक करण्याची आशा व्यर्थ आहे. **बोलाचीच कढी बोलाचाचि भात। जेवूनिया तृप्त कोण झाला?**' हा सवाल मार्मिक आहे. कवीनें म्हटल्याप्रमाणें बुकांतली विहीर बुडवितहि नाहीं आणि बुकांतली होडी तारीतहि नाहीं. 'अश्व' म्हणजे 'घोडा' असें कोशांत लिहिलेलें असतें. मुलांना वाटतें, 'अश्व' शब्दाचा अर्थ कोशांत दिलेला आहे. पण तें खरें नव्हे. 'अश्व' शब्दाचा अर्थ कोशाच्या बाहेर तबेल्यांत बांधून ठेवला आहे. तो कोशांत मावणें शक्य नाहीं. 'अश्व' म्हणजे 'घोडा' हें कोशांतलें वाक्य इतकेंच सांगतें—"अश्व शब्दाचा तोच अर्थ आहे जो घोडा शब्दाचा अर्थ आहे."

तो कोणता? तबेल्यांत जाऊन पहा. कोशांत नुसता पर्यायशब्द दिलेला असतो. पुस्तकांत अर्थ राहत नाहीं. अर्थ सृष्टींत राहतो. हें जेव्हां उमजेल तेव्हां खऱ्या ज्ञानाची चव कळेल.

ज्यांनीं जपाची कल्पना शोधून काढली त्यांचा एक उद्देश साक्षरत्वाला संक्षेप–रूप देण्याचा होता. साक्षरत्व अगदींच भुंकूं लागलेलें पाहून त्याच्या तोंडावर जपाचा तुकडा टाकून द्यावा म्हणजे बिचाऱ्याचें भुंकणें बंद होईल आणि जीवन सार्थक करण्याच्या प्रयत्नाला अवकाश मिळेल हा त्यांतला भाव. वाल्मीकीनें शतकोटी रामायण लिहिलें. तें लुटण्यासाठीं देव, दानव आणि मानव ह्यांच्यांत झगडा सुरू झाला. झगड्याचा निकाल लागेल असा सुमार न दिसल्यामुळें शंकरांना पंच नेमलें. त्यांनीं तिघांना तेतीस कोटी श्लोक वांटून दिले. एक कोटि उरले. पुन्हां तेतीस लाख वांटून दिले. एक लाख उरले. असें उत्तरोत्तर वांटतां वांटतां शेवटीं एक श्लोक उरला. रामायणाचा श्लोक अनुष्टुप छंदाचा. अनुष्टुप छंदाची अक्षरें असतात बत्तीस. शंकरांनीं त्यांतलीं दहा दहा अक्षरें तिघांना वाटून दिलीं. उरलीं अक्षरें दोन. तीं कोणतीं? 'राम' शंकरांनीं तीं दोन अक्षरें वांटणी करण्याची मजुरी म्हणून स्वतः घेऊन टाकलीं. शंकरांनीं आपलें साक्षरत्व दोन अक्षरांत संपवून टाकलें. म्हणून देव, दानव आणि मानव कोणीहि त्यांच्या ज्ञानाची बरोबरी करूं शकला नाहीं. संतांनीं साहित्याचें सर्व सार रामनामांत आणून ठेवलें आहे. पण "अभाग्या नरा पामरा हें कळेना."

संतांनीं रामायण दोन अक्षरांत संपविलें. ऋषींनीं वेदाला एकाच अक्षरांत गुंडाळून ठेवलें आहे. साक्षर होण्याचा हव्यास सुटत नाहीं तर 'ॐ' काराचा जप करा म्हणजे झालें. तेवढ्यावर न भागलें तर चिमुकलें माण्डूक्य–उपनिषद वाचावें. तरी वासना उरली तर दशोपनिषदें पहावीं, अशा अर्थाचें एक वाक्य मुक्तिकोपनिषदांत आलें आहे. त्यावरून ऋषींच्या मनाचा इरादा उघड दिसतो. पण एका अक्षराचा तरी जप केलाच पाहिजे असें ऋषींचें म्हणणें नाहीं. एक किंवा अनेक अक्षरें घेण्यांत जीवनाचें सार्थक्य नाहीं. वेदांचीं अक्षरें पोथींत सांपडतात. अर्थ जीवनांत शोधावयाचा असतो. तुकारामाला संस्कृत न शिकतां वेदाचा अर्थ कळला होता असें त्याचें म्हणणें आहे. त्या म्हणण्याचा आजपर्यंत कोणींच इनकार केलेला नाहीं. शंकराचार्यांनीं आठव्या वर्षी वेदाभ्यास पुरा केला, त्याविषयीं आश्चर्यचकित होऊन कोणा शिष्यानें कोणा गुरुला प्रश्न विचारला–" महाराज, आठ वर्षांत आचार्यांनीं वेदाभ्यास कसा संपविला?" गुरु गंभीरपणानें म्हणाले– "आचार्यांची बुद्धि लहानपणीं तितकीशी तीव्र नसावी. म्हणून त्यांना आठ वर्षें लागली."

एक माणूस औषध खाऊन खाऊन फटाळून गेला. कारण जों जों औषध जवळ करावें तों तों आरोग्य दूर दूर पळूं लागलें. शेवटीं कोणाच्या सूचनेवरून त्यानें शेतांत काम सुरू केलें. शेतांतल्या कामानें आरोग्य लाभून थोड्याच दिवसांत तो मोठा तगडा झाला. अनुभवानें सिद्ध झालेली ही आरोग्याची साधना तो लोकांना सांगूं लागला. एखाद्याच्या हातांत बाटली पाहिली कीं, " बाटलीनें कांहीं व्हावयाचें नाहीं, कुदळी घे म्हणजे आराम मिळले असा " तो मनोभावानें उपदेश करी. लोक म्हणत—" तुम्ही बाटली खाऊन खाऊन तृप्त होऊन बसलांत आणि आम्हांला तेवढी बंदी करतां ? " दुनियेचें असेंच आहे. दुसऱ्याच्या अनुभवानें शहाणपण शिकण्याची माणसाला इच्छा होत नाहीं. त्याला स्वतंत्र अनुभव पाहिजे. स्वतंत्र ठेचा पाहिजेत. मी चांगला सांगतों कीं " पुस्तकांपासून कांहीं फायदा नाहीं. व्यर्थ पुस्तकांत घोटाळूं नको " तर तो म्हणतो, " तुम्हीं पुस्तकें वाचून चुकलां आणि मला असा उपदेश करतां ? " " होय. मी पुस्तकें वाचून चुकलों. पण तूं चुकूं नये म्हणून सांगतो." तो म्हणतो, " मला अनुभव पाहिजे." " ठीक आहे. घे अनुभव. ठेचाळण्याचें स्वातंत्र्य हा तुझा जन्म-सिद्ध हक्क आहे." इतिहासाचा अनुभव आम्ही विचारांत घेत नाहीं. म्हणून इतिहासाची पुनरावृत्ति होते. आम्ही इतिहासाची किंमत करूं तर इतिहासाच्या पुढें जाऊं. इतिहासाची किंमत न केल्यानें त्याची किंमत उगीच वाढून बसली आहे. पण हें लक्षांत येईल तेव्हां खरें !

उद्योगी बना, उद्योगांत सतत मग्न रहा, उद्योग हाच परमेश्वर माना. त्याशिवाय उद्धाराचा दुसरा मार्ग नाहीं. ' नान्य पन्था विद्यते ' तुम्हांला स्वातंत्र्य पाहिजे, सुख पाहिजे आणि आनंदही पाहिजे. मग उद्योग करा, उद्योग करा. आणि सतत उद्योग करा. हेंच जीवन जगणें होय. तें तुम्हीं जगा.

—स्वामि विवेकानंद

# महात्मा बसवेश्वर

: लेखक :

पु. बा. कुळकर्णी

**महात्मा बसवेश्वर यांची जयंति मुंबईत गेल्या आठवड्यांत साजरी झाली. वीरशैव धर्माला अत्यंत उज्ज्वल स्वरूप महात्मा बसवेश्वर यानीं आणून सोडलें. आठशें वर्षांपूर्वीच्या काळांत ज्या सुधारणा रूढ व्हाव्या म्हणून ते झटले त्याच सुधारणांची आजही तीव्रतेनें जरूरी भासत आहे. अशा या क्रांतिकारक सुधारकाग्रणीचा सरतेशेवटीं शेवट काय झाला ?**

महात्मा बसवेश्वर हे बाराव्या शतकांत म्हणजे सुमारें आठशें वर्षांपूर्वी होऊन गेले. शंकराची भक्ति करणाऱ्या वीरशैव धर्मपंथांत त्यांचें स्थान बहुमानाचें व सर्वैव श्रेष्ठ आहे. त्यानीं कोणत्याही नवीन धर्मांची किंवा पंथाची स्थापना केली नाहीं तर प्राचीन काळापासून चालत आलेल्या परंतु अत्यंत खालावलेल्या अशा वरिशैव धर्माला अभिनव व उज्वल स्वरूप प्राप्त करून दिलें. यामुळेंच त्या पंथांत त्यांचें स्थान अजोड आहे.

## एक प्राचीन धर्म

एकाकाळीं वीरशैव धर्मांचा प्रचार भारताच्या सर्व भागांतून झालेला होता. हा धर्म अत्यंत प्राचीन काळीं पंचाचार्यांनीं स्थापन केला असें त्या धर्मांच्या प्राचीन ग्रंथांवरून दिसून येतें. श्री काशी, केदार, उज्जयिनी, बाळेहळ्ळी व श्री शैल या पांच पवित्र क्षेत्रांत त्या धर्मांचे एकाकाळीं स्थापन झालेले मठ आजही अस्तित्वांत आहेत. त्यांची परंपरा अव्याहत चालू आहे. या मठाधिपतींचा मान वीरशैवांमध्यें फार मोठा असून त्यांना जगद्गुरू संबोधण्यांत येत असतें.

उत्तरोत्तर या धर्मांचा ऱ्हास होत जाऊन दहाव्या व अकराव्या शतकांत तर हा धर्म अजिबात नाहींसा होतो कीं काय अशी भीती वाटूं लागली होती. अशावेळीं त्या धर्मांचें रक्षण करण्यासाठीं एवढेंच नव्हे तर त्याला अधिकतर उज्वल स्वरूप प्राप्त करून देण्यासाठीं महात्मा बसवेश्वरांचा जन्म झाला.

## जातीभेदावर कुऱ्हाड

भारतीय समाजाची सुधारणा व्हावी यासाठीं सध्यांच्या विसाव्या शतकांत महात्मा गांधी यानीं मुख्यत्त्वेंकरून ज्या तत्त्वांचा अवलंब केला त्या तत्त्वांची कास आठशें वर्षांपूर्वी महात्मा बसवेश्वर यानीं धरली होती हें पाहिलें म्हणजे कोणाला आश्चर्य वाटणार नाहीं ? अस्पृश्यता नाहींशी व्हावी, जातीभेद समूळ नष्ट व्हावा, सर्वांनीं समान पातळीवर यावें, अहिंसा धर्माचें पालन करावें, दुसऱ्यावर अवलंबून न रहातां व दुसऱ्याकडे भिक्षा न मागतां स्वावलंबनानें व जरूर ती मोलमजुरी करून पोटापुरतें मिळवावें, सत्याचरण करावें, जरूरीपेक्षां अधिक द्रव्याचा हव्यास न धरतां स्वतःच्या गरजा भागून जें उरेल त्याचा विनियोग परोपकारार्थ करावा हीं तत्त्वें किती उच्च व बहुमोलाची आहेत बरें ? याच तत्त्वांचें आचरण व प्रचार महात्मा बसवेश्वरांनीं केला. आणि महात्मा गांधी यांचीं तत्त्वें याहून भिन्न आहेत काय ?

विजापूर जिल्ह्यांतील बागेवाडी नामक गावीं मादरस व मादलांबिका या नावाचें एक सुखी जोडपें रहात असे हें जोडपें शैव पंथीय असून शंकराच्या भक्तींत नेहमीं मग्न असे. त्यांना चिंता कशाचीही करावी लागत नसे; परंतु कधीं कधीं एका विचारानें त्यांचें मन दुःखीकष्टी होत असे. त्यांना मूळबाळ नव्हतें. दैवानें तेवढीच इच्छा अतृप्त ठेविली होती.

## नंदिकेश्वराचा प्रसाद

एके दिवशीं त्यांच्या गांवापासून जवळच कप्पडी संगम येथें रहाणारे जातवेदी मुनी हे त्यांच्या घरीं अकस्मात् आले. त्या जोडप्याला त्यांच्या आगमनानें मोठा आनंद झाला. त्यांची मोठ्या भक्तिभावानें पूजा अर्चा करण्यांत येऊन त्यांच्या सेवेंत कोणत्याही प्रकारें उणीव ठेवण्यांत आली नाहीं. मुंनी महाराज खूष झाले. त्यांनीं त्या भक्तिमान जोडप्याची इच्छा जाणून त्यांना आशीर्वाद दिला. व नंदीश्वराची सेवा करावी म्हणजे इच्छा पूर्ण होईल असाही आदेश दिला. बागेवाडींत ज्या मंदिरांत नित्यनेमानें जाऊन मादलांबिका भक्तिभावानें पूजाअर्चा करीत असत तें नंदीकेश्वराचें मंदीर आजही तेथें पहायला मिळतें.

नंतर मुनीमहाराजांच्या आशीर्वादाप्रमाणें त्या धर्मनिष्ठ व ईश्वरभक्त दांपत्याला पुत्ररत्न होऊन ( सन ११३२ ) नंदीश्वराच्या कृपेनें जन्माला आलेलें बाळ म्हणून त्याचें नांव बसव ठेवण्यांत आलें. कानडी भाषेंत नंदीला बसव म्हणतात.

बालपणापासून बसव अत्यंत हुषार व तैलबुद्धीचा होता. योग्यवेळीं त्याच्या वडिलानीं त्याचा उपनयनविधि करण्याचा घाट घातला असतां त्या बाल वयांतही 'मी उपनयनविधि करून घेणार नाहीं.' असें त्यांनीं निक्षून सांगितलें व तें विद्याध्ययनासाठीं घरांतून बाहेर पडले.

## गुरुगृहीं वास्तव्य

ज्यांनीं त्यांच्या जन्माचें भविष्य वर्तविलें ते जातवेदी मुनी हे महान् संस्कृत पंडीत होते. त्याकाळीं कप्पडी संगम व आसपासच्या दूरवरच्या भागांत त्यांच्या गाढ विद्वत्तेसंबंधानें फार मोठा लौकिक होता. बसवास गुरूच्या शोधार्थ कुठें भटकावें लागलें नाहीं. ते घरून निघाले ते थेट या मुनीमहाराजांच्या घरी येऊन राहिले. सतत सतरा वर्षेपर्यंत त्यांची एकनिष्ठ सेवा करून अनेक शास्त्रांचा व विद्यांचा अभ्यास केला. नंतर आपल्या या तपोनिधि गुरुजींकडून वीरशैव धर्माची दीक्षा घेऊन तेथून ते निघाले.

धर्माचें सत्यस्वरूप त्यानीं ओळखलें होतें. सारा समाज खालच्या पातळीवर कां येऊन पोहोंचला याची त्यांना जाणीव झालेली होती. ते केवळ शास्त्रपारंगत नव्हते तर शास्त्रांचें महत्त्व ओळखून समाजांत शांतता, सुख व समाधान नांदण्यासाठीं काय केलें पाहिजे, शास्त्रांना कशी मुरड घातली पाहिजे याचें ज्ञान सद्गुरूच्या कृपाप्रसादानें त्यांना झालेलें होतें.

आपणास झालेलें ज्ञान सर्व जनतेला देऊन त्यांना सुखी करण्यासाठीं झटावयाचें हीच त्यांची आकांक्षा होती. चंदनाचा सुगंध कुठें दडून का रहात असतो ? ते जेथें जेथें जात तेथें तेथें त्यांच्या गुणांचा प्रभाव पडल्याशिवाय रहात नसे. सद्गुणांचा परिमळ कोणाला मोहवीत नाहीं ? उत्तरोत्तर त्यांची कीर्ति पसरत चालली. जे जे कोणी त्यांच्या सान्निध्यांत येत ते त्यांच्या गुणांनीं भाळले जात असत.

## कल्याण नगरींत आगमन

त्याकाळीं कल्याण नगरींत बिज्जल नामक राजा राज्य करित होता. तो जैनधर्माचा अनुयायी होता. तत्कालीन कल्याण म्हणजेच हैद्राबाद संस्थानांतील बीदर जिल्ह्यांत असलेलें बसव कल्याण होय. आठशें वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. त्याकाळच्या कल्याण नगरीचें वर्णन कोणी करावें ? आम्हीं त्याची केवळ कल्पनाच करावी.

बसवेश्वरांचे मामा बलदेव हे राजा बिजल यांचे मंत्री होते. मग त्यांचा दरारा व ऐश्वर्य किती असेल हें कां वेगळें सांगितलें पाहिजे ? बसवेश्वरांची कीर्ति त्यांच्या कानापर्यंत पोहोंचली होती. बलदेवांची कन्या उपवर झालेली होती. ती भाच्यास देण्याचा विचार त्यांच्या मनांत घोळूं लागला होता. आपली कन्या गंगांबिका ही सुस्थळीं पडावी असें त्यांना वाटत असल्यास नवल नाहीं. एकेदिवशीं वेळांतवेळ काढून ते बसवेश्वरांच्या गावीं गेलें व त्यांच्याजवळ योग्य संधी साधून त्यानीं विवाहाचा प्रश्न काढिला.

'छे ! छे ! ! मला विवाह विवाह कांहीं करावयाचा नाहीं ! ब्रह्मचर्यव्रताचें अखंड पालन करून मी जनतेंत सत्य धर्माचा प्रचार करण्यासाठीं आयुष्यभर झटणार आहे !'

बसवेश्वरांचें हें सडेतोड उत्तर ऐकून बलदेवांची निराशा झाली; परंतु त्यांना त्यांची गुरुकिल्ली बरोबर माहीत होती. त्यानीं त्यांचे गुरुजी जातवेद मुनी यानांच गांठलें व त्यांच्यापुढें आपलें म्हणणें मांडले. जातवेदीमुनी सर्वांच्या कल्याणाच्या दृष्टीनें विचार करणारें होते. त्यांचें बसवेश्वरांवर वजन दांडगे होतें. त्यांना गुरुजींचा शब्द प्रमाण होता.

## गुरुजींचा योग्य सल्ला

गुरुजीनीं आपल्या शिष्याला विवाहबद्ध होण्याचा सल्ला दिला व शिष्यानें तो शिरसावंद्य केला. वैवाहिक जीवन आपल्या ध्येयाच्या आड येणार नाहीं अशी त्यांची खात्री झाली. शिवाय कल्याणसारख्या राजधानीच्या ठिकाणीं राहून आपलें धर्मप्रचाराचें कार्य जास्त सुकरतेनें पार पाडतां येईल असेंही त्यांना वाटलें.

त्याप्रमाणें बसवेश्वर कल्याणास आले. त्यांचा विवाह मोठ्या राजेशाही थाटांत झाला असेल हें का सांगितलें पाहिजे ? कल्याण येथें आल्यापासून त्यांना आपलें कार्य विशेष जोमानें करतां येऊं लागले. राजा बिजल हा विद्वानांचा चहाता होता. बसवेश्वरासारखें रत्न आपल्या दरबारी असावें असा मोह त्याला झाल्यास त्यांत वावगें असें कांहींच नव्हतें. मोठ्या मानसन्मानानें बसवेश्वरांस आमंत्रण करून त्यांनीं त्यास आपल्या दरबारीं बहुमानाची जागा दिली. बसवेश्वर हे मानसन्मानाची व ऐश्वर्याची कदर बाळगणारे किंवा त्यांची चिंता करणारे नव्हते. त्यांची रहाणी अत्यंत साधी होती. जें कांहीं मिळेल त्याचा विनियोग गोरगरिबांसाठीं व अडचणींत सांपडलेल्यांसाठीं करावयाचा हें त्यांचें नेहमींचें व्रत होतें.

## ताम्रपटाचें वाचन

बसवेश्वरांना संपत्ति किंवा मानसन्मान नको असला तरी तो त्यांच्यामागें लागलेला होता. एखाद्याचें भाग्यच तसें असतें.: त्याला कोण काय करणार ? एकदां मोठी मौज झाली. राजाला एकदां एक ताम्रपट कुठेंतरी एकाएकी सांपडला. त्याच्या वाट्याला अधिकाधिक भाग्यश्री यावयाची होती व बसवेश्वराच्या लौकिकांत व वैभवांत भर पडावयाची होती. तो ताम्रपट वाचण्यासाठीं अनेक पंडितांची धडपड चाललेली होती; परंतु त्याचे धागेदोरे कोणालाही बरोबर लावतां येईनात. सर्व पंडीत थकल्यानंतर शेवटीं तो ताम्रपट बसवेश्वरांपुढें आणण्यांत आला आणि त्यानीं तो वाचून राजापुढें त्याच्या संबंधीं अगदीं सहजासहजीं उलगडा केला. त्यांत एका ठिकाणीं असलेल्या गुप्तधनाची माहिती देण्यांत आलेली होती. त्याप्रमाणें खणून पहातां अपरंपार संपत्ति राजाला सांपडली ! मग कां नाहीं राजा खूष होणार ? त्यामुळें राजदरबारांतील बसवेश्वरांचा मानमरातब कमालीचा वाढला. त्यांचा शक्य त्या परीनें बहुमान करण्यांत आला. राजा बलदेव निधन पावल्यानंतर राजाचें बहुमानाचें मंत्रीपद बसवेश्वरांकडे आलें.

## जनतेचें कल्याण

बसवेश्वरांचें राजदरबारांतील स्थान जसें सर्वोच्च होतें त्याचप्रमाणें जनतेच्या अंतःकरणांतील त्यांचें स्थानही परमोच्च होतें. राजा व प्रजा या दोघांनाही त्यांचा आत्यंतिक लळा लागलेला होता. दोघांनाही ते हवे हवेसे वाटत. राजदरबारांतील मानसन्मान किंवा मंत्रीपद याहीपेक्षां त्यांना जनतेंत सत्य धर्माचा प्रचार करून जनतेला खऱ्या सुखाचा मार्ग दाखविण्याची जास्तींत जास्त ओढ लागून राहिली होती. तें तर त्यांचें जीवन कार्य होतें. त्याच्या आड मंत्रीपद येतां कामा नये अशी राजाकडून हमी मिळाली तेव्हांच त्यांनीं मंत्रीपदाचा स्वीकार केला. या मंत्रीपदाचा सदुपयोग त्यांनीं राज्यांत प्रजेच्या कल्याणाच्या दृष्टीनें आवश्यक त्या सुधारणा घडवून आणण्यासाठीं केला. मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग जनतेचें सुख वाढविण्याकडे करावयाचा हें त्यांचें नित्याचें कर्तव्य होतें. त्यांत त्यांनीं केव्हांही कुचराई केली नाहीं.

त्या काळींही धर्मापेक्षां अधर्माकडेच अधिक ओढा होता. किती तरी खुळचट धर्म कल्पना जनतेंत वावरत होत्या. त्या बाजूला सारून जनतेला सत्य व कल्याणकारी धर्माची शिकवण देणें ही फार महत्त्वाची गोष्ट होती. आणि ती कांहीं चुटकीसरशी व सहजासहजीं घडून येणारी गोष्ट नव्हती. जातिभेद, स्पृश्य अस्पृश्य भावना, उच्च नीचतेची भावना या आज जशा आपण पहातों तशाच त्या काळींही कमी अधिक प्रमाणांत वाव करीत होत्याच. जनतेंत दृढमूल झालेल्या समजुती उखडून काढणें व त्यांच्याशीं सामना देणें ही साधी का गोष्ट आहे? महात्मा गांधींना अशा दृढमूल समजुतीशीं कशी टक्कर द्यावी लागली व शेवटीं त्यांतच त्यांचें बलीदान करें पडलें हें आपण पाहिलें नाहीं का? यावरून बसवेश्वरांच्या कार्याची सहज कल्पना करतां येणार आहे.

## अप्रतीम संघटनेची स्थापना

सुदैवानें बसवेश्वरांना एकनिष्ठ अनुयायी लाभलेले होते. तेही आपआपल्या परीनें त्यांना सहाय्य करीत होते. एकनिष्ठ कार्यकर्त्यांची परंपरा निर्माण करणें ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. बसवेश्वरांनी त्यासाठी "**शिवानुभव मंडप**" या नावाची एक त्यागी व जातिवंत कार्यकर्त्यांची संघटना निर्माण केली. या संघटनेंत जातिभेदाला अवसर नव्हता; परंतु भलत्यासलत्या माणसास या संघटनेंत वाव नव्हता. नियम फार कडक होते. सत्य, अहिंसा, न्याय, दया, समता इत्यादि उच्च तत्त्वांचें आचरण करणाऱ्यांनाच या संघटनेंत रहातां येत असे. शुद्ध आचरण व सर्वस्व समर्पण या कसोट्यांतून पार पडावें लागत असे. तेथें भोंदू किंवा ढोंगी लोकांना वाव नव्हता. नाणें पारखून घेतलें जात असे व त्यावर सतत नजर ठेवली जात असे. कोणी कोणावर अवलंबून रहावयाचें नाहीं. प्रत्येकानें पोटापुरतें मिळवावयाचें. फुकटचें किंवा भिक्षा मागून मिळेल त्याच्यावर जगायचें नाहीं. धर्म चिंतन, धर्माचरण, धर्मप्रचार यांकडे

जात्तींत जास्त वेळ खर्च करावयाचा. या संघटनेंतील सर्व शिवशरणांचा दर्जा समान मानला जात असे.

अशा या संघटनेंत राजेरजवाडे होते त्याचप्रमाणें तेली, तांबोळीही होते. मांग होते, ढोर होते व ज्यांच्या ठायीं धर्मश्रद्धा, ईश्वर भक्ति, त्याग भावना व समानता या गुणांचें वास्तव्य आहे त्या सर्वांचा समावेश या संघटनेंत झालेला होता. सर्वजण मांडीस मांडी लावून धर्म चर्चेत भाग घेत असत व प्रत्येकाच्या शब्दास तेथें मान दिला जात असे. या चर्चेतून ज्या गोष्टी निष्पन्न होत त्याची नोंद ठेविली जात असे. हा तत्वबोध सर्वांना व्हावा यासाठीं सर्वानुमतें जीं वचनें मुक्रर झालीं त्यांचा संग्रह कन्नड भाषेंत वचन वाङ्मय या नांवानें प्रसिद्ध आहे. त्या वचनानी अनेकांच्या जीवनांस उजाळा व स्फूर्ति दिलेली आहे. या वचन वाङ्मयावर जितकें लिहावें तेवढें थोडेंच आहे.

आठशें वर्षांपूर्वीच्या काळांत जिची तुलना गांधी सेवा संघासारख्या संस्थेशीं उत्तमप्रकारें करतां येईल अशी 'शिवानुभव मंडप' संघटना बसवेश्वरांनीं निर्माण केली व समाजांत निस्सीम, त्यागी व उच्च ध्येयांस वाहिलेल्या कार्यकर्त्यांचा एक संघ निर्माण केला ही केवढी कौतुकास्पद घटना आहे! यावरून बसवेश्वरांच्या थोरपणाची, दूरदर्शित्वाची व जनतेच्या सुखासंबंधीं त्यांच्या तळमळीची सहज कल्पना करतां येणार आहे.

## केवढी ही कामगिरी

जातीभेद हा आमच्या राष्ट्राला जडलेला एक महान् व दुर्धर रोग आहे. या रोगानें आमचें राष्ट्रीय व सामाजिक जीवन खिळखिळें करून टाकलें आहे. भेदभावाच्या व उच्च नीचतेच्या दुर्भेद्य भिंती उभारण्यांत आल्यामुळें आमच्या संघटनेस सुरुंग लागलेला आहे, आम्हीं एकत्र येऊन प्रेमभावानें एकमेकांशीं वागूं शकत नाहीं. आम्हीं एकमेकांचा द्वेष व मत्सर करतों. जो तो स्वतःपुरता ही भावना प्रत्येकाच्या अंतःकरणांत दृढमूल झालेली आहे.

आठशें वर्षांपूर्वीच्या काळांत या दुर्धर राष्ट्रीय रोगाची जाणीव होऊन बसवेश्वरांनीं जातिनिर्मूलनास हात घातला. स्पृश्य अस्पृश्य हें बंड मोडून टाकण्यासाठीं ते सक्रिय झटले. समता, ममता, सत्य व अहिंसा या तत्त्वांवर आधारलेला व या तत्त्वांचें मनोभावें पालन करणारा असा समाज स्थापन करण्यासाठीं ते मनोभावें झटले.

## अस्पृश्य कोण?

जगांत अस्पृश्य कोण? जे कोणी समाजांत नीच कर्म करतात, अनाचार तेच अस्पृश्य; मग त्यांचा जन्म कोणत्याही जातींत झालेला असो. अशी अस्पृश्यतेची व्यापक व्याख्या त्यांनीं केली.

प्रत्येकानें सतत कांहीं ना कांहीं उद्योग करावा. आळसांत एक क्षणही फुकट दवडूं नये. दुसऱ्यावर केव्हांही अवलंबून राहूं नये. कोणताही व्यवसाय वा धंदा नीच किंवा हलक्या दर्जाचा नाहीं. आपण अप्रामाणिकपणें वागून व्यवसायाला नीचपणा आणतों.

मनुष्याचा दर्जा त्याच्या गुणांवर, विद्वत्तेवर, त्यागभावनेवर व कर्तृत्वावर ठरविण्यांत यावा. जातपात ही दर्जा ठरविण्याची कसोटी मुळींच नव्हे. प्रत्येकानें परस्पराशीं बंधुभावानें वागावें. स्त्रियांस कमी लेखण्यांत येऊं नये. स्त्रियांची योग्यता पुरुषांच्या बरोबरीनें आहे. त्यांना समाजांत पुरुषांच्या बरोबरीनें मान असावा अशी बसवेश्वरांची शिकवण होती. त्यांच्या शिवशरण संघटनेंत अनेक बुद्धिमान् व त्यागी स्त्रिया होत्या. शिवानुभव मंडप या संघटनेंत स्त्रियाही चर्चेत पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेत असत. मागें अक्कमादेवीचें चरित्र प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. त्याही बसवेश्वरांच्या अनुयायी व शिवशरण मंटप संघटनेत दाखल झालेल्या होत्या.

## मातृभाषेला महत्त्व

बसवेश्वर हे संस्कृत पंडीत होते. त्याकाळीं संस्कृत भाषेला फार महत्व होतें. त्यांना आपलें वाङ्मय संस्कृत भाषेंत निर्माण करतां आलें असतें. परंतु त्यांना सर्व-साधारण जनतेपर्यंत ज्ञानगंगा नेऊन पोहोंचवावयाची होती. त्यासाठीं त्यानीं कन्नड भाषेची अर्थात् मातृभाषेची कांस धरली व सर्व वाङ्मय त्या भाषेत निर्माण केलें.

श्री बसवेश्वर हे एक थोर समाजसुधारक होऊन गेले. समाजांत क्रांतिकारक सुधारणा त्यानीं घडवून आणिल्या परंतु त्या सुधारणांचा पाया त्यानीं धर्मावर आधारलेला होता. 'पहिलें तें धर्मकारण' हा त्यांचा दंडक होता.

आज आम्हीं समाजवादाच्या निव्वळ गप्पा मारीत आहोंत; परंतु बसवेश्वरांनीं त्या काळांत स्वतः समाजवादाचा अवलंब करून आपल्या अनुयायांकडूनही त्या तत्त्वाचा प्रचार करविला व त्यांना आचरणांत आणायला लाविला. प्रत्येकानें धनदौलत कमवावा परंतु स्वतःला जरूर तेवढा तिचा वापर करून बाकीच्या दौलतीवर समाजांतील इतरेजनांचा, गरजवंतांचा हक्क असावा अशी प्रथा त्यानीं पाडिली.

श्री बसवेश्वरांनीं केवळ धर्मप्रचाराला महत्त्व दिलें नाहीं. त्यांना माणुसकीवर अधिष्ठित असा उच्च मानव समाज निर्माण करावयाचा होता. त्यासाठीं समाजकारण, अर्थकारण त्यानीं योग्यप्रकारे हाताळले.

## समाजसुधारकाचें खडतर जीवन

समाजसुधारकाचें जीवन मोठें खडतर असतें. किती सावकाशपणें त्यानें पाऊल टाकावयाचें असतें. समाजांतील उच्चनीचता नाहींशी व्हावी, अस्पृश्यतेचा नायनाट व्हावा यासाठीं ते अत्यंत आतुर झालेले होते. एकदां अशी एक घटना घडून आली कीं त्यामुळें त्यांना समाज सोडून दूर जावें लागलें.

एकदां शरण मधुवरस या नावाच्या ब्राह्मण मंत्र्याच्या मुलीशीं त्यांनीं चांभार जातींतील हरळय्या या नावाच्या मुलाशीं विवाह घडवून आणिला. बसवेश्वरांना त्या काळांत समाजसुधारणा कळसास नेऊन पोहोंचवावयाची होती.

या त्यांच्या कृतीनें सारा सनातनी समाज खवळला व हादरल्यासारखा झाला. बसवेश्वरांचें जीवन निष्कंटक नव्हतें. त्यांच्यावर टीकेचे आघात सतत सुरू होते. सनातनी समाज त्यांना नेहमी पाण्यांत पहात असे. या त्यांच्या कृतीनें तर तो अधिकच खवळला. लोकांनीं राजाचे कान फुंकिले. धर्म बुडाला, सवगोलांकार झाला अशी आरडा ओरड सुरू झाली. राजाही बिथरला. राजानें त्या जोडप्याला पकडून आणून त्यांचे डोळे काढविले. राजांचें हें अत्यंत कठोर कृत्य पाहून बसवेश्वरांचे अनुयायीही चवताळले, त्यांचा मनावरील तावा गेला. राज्यांत वंडाळी माजली. ज्या अहिंसा तत्त्वासाठीं बसवेश्वर झगडत होते व त्याचें आचरण व्हावें म्हणून जीवतोड मेहनत घेत होते त्या तत्त्वाचा मुडदा पडण्याची पाळी येऊन ठेपली. आपल्या अनुयायांनीं तरी हिंसेला बळी पडूं नये यासाठीं त्यांनीं महत् प्रयत्न केले, परंतु त्यांत त्यांना यश आलें नाहीं.

श्रीबसवेश्वरांचा या परिस्थितींत निरुपाय झाला. त्यांनीं एके दिवशीं कल्याण नगरीला राम राम ठोकला व आपल्या गांवीं जाऊन ते एकांतांत, सर्वांपासून दूर राहिले. केवढें महान् कार्य त्यांनीं आरंभिलें होतें ! त्यासाठीं त्यांनीं सारें जीवन अर्पण केलें. किती थोर व उदात्त विचार होते त्यांचे ! परंतु शेवटीं निराशेनें त्यांना समाज सोडून दूर जाऊन रहावें लागलें. त्यांनीं आपलें कर्तव्य इमानें इतबारें पार पाडलें होतें. त्या समाधानांत व शिवचिंतनांत शेवटीं त्यांनीं देह ठेविला.

महात्मा बसवेश्वर हें जग सोडून गेले तरी त्यांचीं अमर तत्त्वें आजही जगावर प्रभाव पाडण्यासाठीं सतत डोकें वर करीत आहेत. तीं तत्त्वें अमर आहेत. त्यांचा जय आज नाहीं उद्यां होणार हें निश्चित आहे.

---

माझ्या शूरवीर बंधूनो ! तुमचें पाऊल पुढें पुढें पडत जाऊं द्या. सुसंघटीत व्हा. संघबद्ध व्हा. शिस्तीची कांस धरा. कसून काम करा. पवित्र विचारांस मनांत थारा द्या. घाणेरडे विचार हद्दपार करा. मग पहा दिव्यत्व तुम्हांला येऊन चिकटेल. जीवनांत यशस्वी होण्याचा हाच मार्ग आहे.

—स्वामी विवेकानंद

# यंदाचा श्रीरामनवमी महोत्सव

श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संत-चूडामणी श्रीसाईबाबामहाराज मु॥ शिर्डी यांचा श्रीरामनममी उत्सव मिती चैत्र शु॥ ८ रोज सोमवार दिनांक १।४।६३ ते मिती चैत्र शु॥ १० रोज बुधवार दिनांक ३।४।६३ पावेतों श्रींचे समाधी मंदिरात साजरा झाला. श्रीरामनवमी उत्सव करितां मुंबई, पुणें, सोलापूर, नाशिक, नागपूर, अमरावती, बऱ्हाणपूर, इंदौर, हैद्राबाद, मद्रास, मराठवाडा नांदेड परभणी, औरंगाबाद, म्हैसूर, वगैरे ठिकाणाहून बरेच साईभक्त शिर्डीस आले होते, व नगर जिल्ह्यांतील कोपरगांव तालुक्यातील व श्रीरामपूर, संगमेर, नेवासा, वगैरे ठिकाणाहून बरेच भक्त शिर्डीस आले होते. शिर्डीजवळपासचे खेड्यातील बरेच लोक बायका मुलांबाळासह शिर्डीस आले होते.

उत्सवा निमित्त श्रीसाईबाबा संस्थानतर्फे भव्य मांडव घातले होते तसेंच ध्वज पत्ताका तोरणे मंदिरास व सर्व संथानचे इमारतीस व्हाईट वास आईल-पेंट रंग देऊन सुंदर सुशोभित केले होते. तसेंच सॅनिटेशन खात्याकडून स्वच्छता झाडझूड सफाई फिनले डि. डि. टी. मारून पिण्यार्चे पाण्यात औषध टाकून रोगराई न होईल अशी दक्षता घेण्यात आली होती. संरक्षण बंदोबस्त पोलीस होमगार्ड, स्वयंसेवक, वॉचमन जादा ठेवण्यात आले होते. हायस्कूल, मराठी शाळा, दवाखाना बांधकाम वगैरे ठिकाणी भक्ताना उतरण्याची व्यवस्था व स्नानाची, पिण्याच्या पाण्याची, व ( कँटीन ) चहाफराळाची दिवाबत्तीची उत्तम सोय करण्यांत आली होती. तीन दिवस उत्सवात सर्व भक्तांना नेहमींचे दरांत रोज पक्वान्नांचे जेवण देण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. गोरगरीबांना अन्नसंतर्पण करण्यांत आलें.

उत्सवाचा कार्यक्रम दि. १-४-६३ सोमवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त अखंड नामजप यज्ञ २४ तास व साईसच्चरित्रपारायण, पहांटे ६ वाजतां श्रींचे मंदिरांतून फोटोची व पोथीची मिरवणूक श्रींचे निंबवृक्षपारावरून श्रींचें द्वारकामाईंत भव्य चांदीचें मखरांत श्रींचे फोटोची स्थापना करून सुरवात झाली. दुपारीं ४ ते ६ पर्यंत श्री. अनंतराव आठवले, आयुर्वेदाचार्य, पुणें, यांचें कीर्तन, रात्रौ श्रींचे पालखीची गांवांतून मिरवणूक सुर, सनई, बँड, चौघडा, टाळ, मृदंग भजन वगैरेसह झाली.

दि. २-४-६३ मंगळवार पहाटे नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे द्वारकामाईंत चौवीस तास अखंड नाम जपयज्ञाची व श्रीसाई सच्चरित्रपारायणाची समाप्ती व मिरवणूक परत मंदिरात आली. सकाळीं ७ ते ८ वाजे पर्यंत श्री गंगागोदावरीच्या कावडींची मिरवणूक गांवांतून मिरवून त्यांची शास्त्रोक्त पूजा करून त्या कावडींचें

स्नान श्रीचेसमाधीस घालणेंत आलें. नंतर श्रीचे मंगलस्नान वस्त्रार्पण पुष्पार्पण, भक्तांचे सामुदायिक अभिषेक पूजा. नंतर ११ ते १२॥ पर्यंत श्रीरामजन्मोत्सव कीर्तन श्री. अ. झा. आठवले पुणें यांचे झाले. सायंकाळीं निशाणाची व रथाची मिरवणूक रात्रौ (सहल मिरवणूक) व कलाकारांच्या रात्रभर हजेऱ्या पहांटे सहा वाजेपर्यंत जागरण झालें. कलाकारांत मुंबईंचे प्रसिद्ध गायनाचार्य श्री. सुरेंद्रराव दादर, मुंबई, यांचे गायन पुण्याचे श्री. चंद्रकात देवळणकर व श्री. ननोहर लोणकर पुणें यांचे सनईवादन असे कार्यक्रम फारच बहारीचे झाले. तसेंच श्री. वामन गोविंद आपटे दादर मुंबई व श्री. लिलाधर बी. पाटकर, मुंबई. यांचेही शास्त्रोक्त गायन चांगले झालें. गायनाचे कार्यक्रमास रात्रभर मे. रिसीव्हरसाहेब जातीने हजर होते. सर्वांना; प्रसाद म्हणून श्रीफल व बिदागी त्यांचे हस्ते देणेंत आली. रात्रौ दारू काम उडविण्यांत आलें.

दि. २।४।६२ बुधवार रोजीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सामुदायिक अभिषेक पूजा व ११ ते: १२॥ पर्यंत गोपाळकाला कीर्तन, दहीहंडी, खेळ, फुगड्या, पिंगा (रणघोडा) हातकोपरा वगैरे खेळ, काला, कीर्तन होऊन उत्सव समाप्त झाला. :झाला. रात्रौ ७॥ ते ८॥ पर्यंत साकोरी कन्याकुमारी यांचें मंजुळ सुरेल भजन झाले. उत्सवांत बंदोबस्तासाठीं आलेले पोलीस, स्वयंसेवक तथा संस्थान नोकर वर्ग यांस फराळपाणी तीन दिवस व नोकरांस भोजन वगैरे देण्यांत आले. दुपारीं कुस्त्यांचा कार्यक्रम नेहमीप्रमाणें झाला. अशा तऱ्हेनें श्री रामनवमी उत्सव मोठ्या उत्साहांत व आनंदांत साईकृपेनें पार पडला.






## मार्च १९६३

**या** महिन्यांत मागील महिन्याप्रमाणेंच शिर्डीस भक्तांची गर्दी श्रीचे दर्शनास होती, कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें—

**कीर्तन :** श्रीमती गंगामाई कदम मु. पंचवटी (नासिक) श्री. ह. भ. प. पोपटबुवा लोहणेकर मु. लोहणेर ता. सटाणा, सौ. कमलाबाई गंगाधर कुंटे, मु. कळवा. जि. ठाणें, श्री. ह. भ. प. तुकारामबुवा आजेगांवकर मु. आजेगांव. जि. परभणी (मराठवाडा), संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांची (श्री तुकारामबीज) (श्री एकनाढषष्टी) (गुढीपाडवा) व दोन एकादशा अशी या महिन्यात पांच कीर्तनें झाली.

**गायन :** श्री. चंद्रशेखर महादेव ढगे मु. एलीचपूर (वऱ्हाड), मास्टर अभिचंदभाई मु मुलुंड, मुंबई, श्री. विष्णु शंकर कळस विलेपारले (मुंबई), श्री. सुधीर केसरकर मुंबई; श्री. जयवंत कुळकर्णी मुंबई; श्री. लक्ष्मणदास सी. भाटीया मुंबई; श्री. पांडुरंग रामा अंजारामकर मुंबई.

**भजन :** श्री. भक्तराज आणि मंडळी इंदौर (मालवा) श्रीशनेश्वर एक तारी भजन मंडळ मु. धारावी, जि. ठाणे.

रंगपंचमी व गुढीपाडवा या दिवशीं रथाच्या मिरवणुकी झाल्या.

**बँडपथके :** श्री. आदर्श बँडपथक करीरोड मुंबई, श्री. प्रकाश ब्रॉस बँडपथक चाळीसगांव.

**मोठ्यांच्या भेटी :** श्री. एच. पी. हिरा. रिटायर्ड जनरल मॅनेजर सेंट्रल रेल्वे श्री. मे. चीफजस्टीस चैनानी हायकोर्ट मुंबई उभयतां येऊन श्रीची पूजाअर्चा केली.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई नाहीं.

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

**श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | **श्रीसाईसच्चरित्र** | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | " | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | " | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | " | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | " | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**- | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | **श्री साईलीलामृत** | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | " | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | **साईबाबा-अवतार व कार्य** | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | **साईबाबांचे ४ अध्याय** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | **सगुणोपासना** | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | " | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | **स्तवन-मंजरी** | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | **श्री साई-सुमनांजली** | (मराठी १०८ नांवें). | | ००-०६ |
| (१७) | **कीर्तन पंचक** | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | **शीलधी** | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | **श्री साईगीतांजलि** | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshid Mehta | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | (मराठी) | | ००-२० |

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | " " " 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | " " in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां
प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्पे, मुंबई १४.



★

संगीताची मंदिनी
माणसाला मंत्रमुग्ध करते,
त्याचप्रमाणें कुठल्याहि
हृदयंगम चित्राची मुद्रणकृति
वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच
हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणी मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: दा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.